# प्रकरण तिसरे

## 'मरणकळा' व 'भटक्या' या दोन आत्मकथनांचा तुलनात्मक विचार

## प्रकरण तिसरे

# 'मरणकळा' व 'भटक्या' या दोन आत्मकथनांचा तुलनात्मक विचार

'मरणकळा' हे भटक्या जमातीचे चित्रण करणारे आत्मकथन आहे. जनाबाई कचरू गिऱ्हे यांनी आयुष्यात सहन केलेल्या, भोगलेल्या, अनुभवलेल्या, पाहिलेल्या जीवनाची आत्मकहाणी आहे. 'मरणकळा' मरणाच्या कळा, कळा-वेदना मरणयातना, वेदना यांची गुंफलेली माळ म्हणजे 'मरणकळा' हे आत्मकथन होय. 'दलित पुरूषांच्या आत्मचरित्रातून 'स्त्री प्रतिमा' या परिसंवादात प्रसिद्ध विचारवंत डॉ. जे. एम. वाघमारे म्हणतात की, ''दलित स्त्रीची इमेज जर खऱ्या अर्थाने पहायची असेल तर स्त्रियांनीच मोठ्या प्रमाणात लिहायला पाहिजे. हे मत योग्यच आहे.' ''स्त्रीने केलेल्या अनुभवाचे वर्णन हे स्त्रीत्वाचा अनुभव असतो''[१]. हे मंगला वरखेडे आणि वाघमारे यांचे मत विचारात घेण्यासारखे आहे. कारण पुरूषांच्या दु:खापेक्षा स्त्रियांची दु:ख अधिक भयंकर विदारक असतात. अपरिहार्यपणे त्यांच्या जीवनात व्यवस्थेने लादलेली असतात. स्त्री म्हणून तिचा अनुभव वेगळा असतो. दलित स्त्री म्हणून अनुभव वेगळा असतो अशा वास्तवाचा स्फोटक अनुभव गोपाळा या भटक्या जमातीमधील जनाबाई कचरू गिऱ्हे यांच्या 'मरणकळा' मधून शब्दबद्ध झाला आहे. काळोखात जगण्याचे अनुभव, मरणकळा भोगाव्या लागलेल्या जगण्याचे अनुभव मराठी साहित्यात भटक्या जमातीतील स्त्रीचे अनुभव प्रथमच अभिव्यक्त केले आहेत. नऊ वेगवेगळ्या आत्मलेखातून ही आत्मकथा साकार झाली आहे.

गोपाळ जमातीत जन्मलेल्या मुलीच्या वाट्याला आलेले जीवन हाच 'मरणकळा' या साहित्यकृतीचा आशय, विषय आहे ही जमात बारा महिने सतत भटंकती करीत असते. एका गावात तीन दिवसापेक्षा अधिक दिवस यांना राहता येत नाही. त्यामुळे म्हशीच्या पाठीवर प्रपंच सतत फिरत असतो. ज्या ठिकाणी म्हशीला चारा आणि पाणी मिळेल अशा रानावनात, जंगल झाडीत यांचा मुक्काम असतो. गोपाळ लोक गटागटाने भ्रमंती करीत असतो. नगर भागात खेर्डे, पाथर्डी, सांगवी, जांभळी, माळेगाव, मढी, सुसारे, शेवगाव, पिंपळगाव, नेपती, धारवाडी इत्यादी ठिकाणी पोट भरण्यासाठी फिरत असतात.

मुक्कामाच्या ठिकाणी पालं ठोकायची भीक मागून जीवन जगायचे. या समाजाला सार्वजनिक समाजामध्ये मान, प्रतिष्ठा बिलकुल नसते. सवर्ण समाज यांच्याकडे नेहमीच संशयी नजरेने पाहतो. या संदर्भात डॉ. अनिल अवचट म्हणतात की, ''या जमावाच्या सांस्कृतिक उपेक्षेवर खूपच प्रकाश पडतो. या भटक्या जमातींना गावाबाहेर तर लोटले गेले आहेच, पण त्यांच्यावर 'गुन्हेगार' असाही शिक्का परंपरेने बसलेला आहे. यामुळे जमातीतील माणसे सतत कुठल्या ना कुठल्या तरी मानसिक दबावाखाली वावरताना दिसतात. भीतीमुळे प्रकटीकरणाची (Articulation) त्यांची सवय जवळजवळ सुटलीच आहे.''[२] 'मरणकळा' या आत्मकथनात याचा प्रयत्न येतो. लेखिका आजीचा एक प्रसंग सांगते मुक्कामाच्या ठिकाणी जायला संध्याकाळ झाली. बिऱ्हाडात अन्नाचा कण नव्हता. लहानलहान मुलं चालून भुकेने व्याकूळ झाली होती. भाकरीसाठी आईजवळ रडून आक्रोश करत होती. मुलांना काय द्यावे हा तिच्यापुढे मोठा गहन प्रश्न होता. पतीला भीक मागायला जाण्यासाठी विनवणी करत होती. शेवटी असह्य होऊन तीही मुलांप्रमाणे आक्रोश करू लागली तेव्हा कुठं तिचा गोपाळ फाटकी झोळी घेऊन पालापासून दूर असणाऱ्या गावात जातो. अंधार पडलेला हा भाकरी द्या म्हणून नाठ्यांच्या (मराठ्यांच्या) बायकांना विनवणी करू लागला. एका नाठ्याच्या बाईने चोर म्हणून गोंधळ केला आणि गावातील लोक जमा होऊन त्याला चोर म्हणून चावडीवर बांधून ठेवतात. त्याचा एकच प्रश्न होता. ''पाटील, मला सोडा भाक्री द्या''[३] त्याची विचारपूस न करताच त्याला गुन्हेगार ठरविला. इकडे मुलं भाकरीची वाट पाहून वडिलांच्या वाटेकडे अन्नाचे दोन घास मिळतील म्हणून आतुरतेने वाट पहात होती. वाट पाहून अन्नाविना व्याकूळ झालेली मुलं फाटक्या गोधडीत अश्रूंच्या आणि भूकेच्या संगतीत झोपी जातात. गोपाळणीला मात्र चिंता लागते. बरीच रात्र झाली तरी गोपाळ आला नाही. मग शेजारच्या पालातील एक गोपाळ आणि गोपाळीण त्याला शोधायला जातात. तर त्याला चावडीत बांधून ठेवले आहे. चोरी न करताही गावकऱ्यांच्या हाता-पाया पडून त्याची सुटका करावी लागली. असह्यतेपोटी सर्व सहन करण्याची परंपरा किंवा प्रवृत्तीच या समाजाच्या रक्तात भिनलेली आहे. तेथे ती प्रतिकार करत नाही उलट आजी सांगते. ''आज्याच्या तोंडातून शबुदबी निघत नव्हता. आजा गावात घुसला नि धरावनी भाक्री मागायला लागला. जागाचा

हालना त्याचा मुकेपणा, धीटपणा बघून बाया शिव्या दियाला लागल्या''[४] अबोल असल्यामुळे उपाशी पोटानं ती रात्र काढावी लागली.

या गोपाळ जमातीला फक्त पोटासाठीच लाचार व्हावे लागते असे नाही तर त्यांच्यातील एखादे मयत झाले तरी त्याचा अंत्यविधी देखील गावकरी आपल्या गावात करू देत नाहीत. ते प्रेत दूर कोठे तरी झोळीत घालून न्यायचे गावाला सुगावा न लागताच माहीत न करताच एखाद्या ओढ्यात जंगलझाडीत पुरावे लागते. म्हणजेच स्थिरतेची अपेक्षा करायची नाही. भटकत राहायचे, म्हशी हीच संपत्ती समजून जगायचे ही गोपाळ समाजाची रीतच होऊन बसली आहे. गावात जागा नाही आणि मेल्यावर अंत्यविधीसाठी जागा नाही अशी स्थिती या समाजाची आहे. भारत स्वातंत्र्यानंतर लोकशाही सुरू झाली तरी स्वातंत्र्यांचे अधिकार या लोकांना मिळाले नाहीत ते अजूनही त्यापासून वंचित आहेत. उपेक्षितांचे जिणे जगताना दिसतात. लक्ष्मण गायकवाड यांनी एका लेखात आपले मत व्यक्त केले आहे ते योग्यच वाटते. ''हा चातुर्वर्णी व्यवस्थेतील समाज आज एवढा चतुर आहे की, मृत्यूनंतर त्याचे पुतळे उभे करतो, त्याला देवपण मिळवून देतो पण त्याच्या विचारापासून समाजाला वंचित ठेवतो''[५] आंबेडकर, गांधीजी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रेरणेने आश्रयाने हे भटके देखील तळहातावर प्राण घेऊन लढले तरी ही त्यांचे जीवन उपरेच आहे. भीक मागणे, लाचार होणे एवढेच त्यांच्या हाती आहे. एका गावात पाटलाच्या घरी लग्न होते, म्हणून तेथे लेखिका आणि इतर जण भीक मागायला जातात मोठ्या आशेने जातात. आज भरपूर आणि गोडधोड खायला मिळणार याचा आनंद झालेला. पण पाटलाच्या दारात गेल्यानंतर गोडधोड मिळायचे बाजूलाच राहते. त्यांचा मार आणि शिव्या भरपूर मिळतात. माणसांच्या पंगतीला मार आणि कुत्र्यांच्या पंगतीला उस्टे, खरकटे घरी घेऊन यावे लागते. पशूपेक्षाही हीन स्वरुपाचे जीवन जगावे लागते. संस्कृतीने माणूस आणि पशू यांच्यात केलेला फरक येथे रहात नाही. कुत्र्या मांजरापेक्षा वाईट जीवन जगतात. स्वत:चे असे यांच्याकडे काहीच नसते. त्यामुळे लहान-लहान गोष्टीसाठी त्यांना सवर्ण समाजाचा मार घ्यावा लागतो. एकदा लेखिकेच्या चुलतीने शेताकडेची सरपणासाठी काट्याची फांदी घेताच तिला मार आणि अत्याचार सहन करावा लागतो. घृणास्पद अत्याचाराला प्रतिकार करताच सर्वच पालांना आग लावण्याची धमकी दिली जाते. सर्वच गोपाळांना रक्तबंबाळ होईपर्यंत मारले जाते.

अंगावरती जखमा घेऊन रातोरात पालं हलवावी लागतात. अस्पृश्यतेला क्षणोक्षणी सामोरे जावे लागते. लेखिकेला शाळेत घालताच सवर्ण बायका म्हणतात, ''काय बया, ही भिकाऱ्याची सेमंडी मेमंडी पोरगी साळात बसायची काय. हे तर नवलच बया. मास्तर या पोरीला आमच्या पोरीच्या शेजाला बसू नका नयतर हाकला त्या पोरीला.''[६] भटक्या लोकांनी शिक्षण घ्यायचे नाही त्यांनी शिक्षण घेणे म्हणजे आश्चर्याची गोष्ट असा त्यांच्याकडे पाहण्याचा हीन दृष्टीकोन दिसतो. अशा परिस्थितीमुळेच हा भटका समाज हजारो वर्षे अज्ञानीच राहिला आहे. महाराष्ट्रात सात्विकतेचा उपदेश करणारा भागवत संप्रदाय निर्माण झाला. लोकांना ज्ञानी डोळ्यातून शास्त्रीय डोळ्यातून पाहण्यास सांगत असतानाही तो आंधळ्या डोळ्यातून पहात आहे. याची खंत वाटते. कितीही कष्ट केले तरी त्याचा योग्य मोबदला त्यांना मिळत नाही. शाळेसाठी लेखिका आणि आजी खेड्र्याला आसाराम माळ्याच्या शेतात झोपडीत राहतात. त्यांच्या मळ्यात आजी अहोरात्र काम करायची. म्हशींची शेण-घाण, देखभाल करायची पण त्याचा मोबदला काय तर ''ताजी भाकर कोड्र्यास कधीच धील न्हाय''[७] शिळे विटलेले तेही भरपूर नाही दुपारच्या सुट्टीत लेखिका भीक मागायची असे पोटासाठी शाळेसाठी कष्ट करत असतात. या देशात अंगमेहनत करणाऱ्या माणसाला जाणून-बुजून कमी प्रतिष्ठेचे ठरविण्यात येते. त्यांचे आर्थिक शोषण केले जाते. अंगमेहनत करणाऱ्या माणसाला उच्च दर्जा देण्यात आला. तर ती व्यक्ती, तो समाज निश्चितच बलवान होत जाईल. यांच्या कष्टाचा विचार होत नसल्यामुळे भीकेशिवाय पर्याय रहात नाही. धडधाकट दिसायला लागले की भीकही मिळत नाही. ''एवढी मोठी घोडी काम करायला मरती का? पोटाची आग खाण्यावाचून थोडीच थांबतीया? शिव्या द्या की मारा पर घासकुटका द्याच त्यांच्या बोलण्याला शिव्याला शिव्या जोडल्या जायाच्या. पर शिव्यांची साखळी कधी तुटली न्हाय. पोटाची आग कधी निवली न्हाय. निवली असलं ती भीक मागून'' अशी भीक मागून कधी उपाशी राहून, शिव्या, मार घेत लेखिका शाळा शिकत असे.

या आत्मकथनाचा अभ्यास केल्यानंतर जाणवते की, स्वतःच्या व शेजारच्या कुटुंबाची वर्णने केलेली आहेत. आई वडील, चुलता, चुलती, मामा, आजोबा, आजी, सासू, दीर, नणंद अशा नात्यातील जातीतील व्यक्तीचित्रे ठसठशीतपणे रेखाटून त्यांच्याद्वारा जातीच्या सामाजिक प्रवृत्तीचे व स्थितीचे चित्रण व्यक्त होते. हा समाज सतत भटकंती करीत असतो. त्यांच्या समाजाच्या म्हणून काही रूढी, परंपरा

रीतीरिवाज, श्रद्धा-अंधश्रद्धा असतात. गोपाळ समाजात मुलाची पाचवी करण्यासाठी बकरा कापावा लागतो. यांच्यात दरिद्र्याची अत्यंत श्रीमंती असल्यामुळे काही वेळेला त्यासाठी चोरी करावी लागली तरी चोरी करतात, सापडली तर मार घेतात पण विधी हा केलाच पाहिजे. हे परंपरेने मनावर ठसलेले असते. या समाजात नवीन काही कोणी केले की, त्यांना वाळीत टाकले जाते. गोपाळ मुलीने शिकणे म्हणजे कलंक लावणे. गोपाळ समाजातील एक मुलगी शिकते ही कल्पनाच या समाजाला सहन होत नाही. लेखिकेच्या शिक्षणाला पहिला विरोध होता तो आजीचा आणि आईचा पण वडिलांच्या पुढे त्यांचे चालत नाही. दुसऱ्यांदा चुलते चुलती विरोध करतात. तिसऱ्यांदा मढीच्या जत्रेत जातपंचायतही पोरीला शिकवायला विरोध करते. जातपंचायतमध्ये निवाड्याच्यावेळी झालेली चर्चा ही कोणत्याही माणसाला भयंकर वेदना देणारी आहे. मुलगी शिकते म्हणून ती ठेवल्याल्या रांडेची मुलगी आहे. असे जात पंचायत सांगते, शिक्षण घेणे म्हणजे नवे करणे, त्यासाठी दंड भरायला लावणे पण लेखिकेचे वडील जातपंचायतीला प्रतिकार करतात, मुलगा आणि मुलगी यात फरक नाही दंड भरणार नाही म्हणतात; मात्र जातपंचायत त्यांच्या पालावर बहिष्कार टाकते. तरीही निकराचा संघर्ष करतात. मुलीला शिक्षण देण्यासंबीधी जातपंचायतीची ही भूमिका कोणत्याही समाजातील स्त्री मनाला क्लेशदायक आहे. जातपंचायतीचा हा दृष्टिकोन परंपरागत आहे या समाजाने व जातपंचायतीने आपली मानसिकता व मत बदलायला पाहिजे. प्रल्हाद कुलकर्णी यांनी दलित स्त्रीची प्रतिमा स्पष्ट करताना म्हटले आहे की, ‘‘दलित स्त्रीचे जीवन हे कष्टाचे, मनाचा आणि शरीराचा कोंडमारा करणारे असते.’’[८] तेव्हा साहजिकच असा प्रश्न पडतो की अशा जीवनाला तोंड देण्यासाठी सामोरे जाण्याची इच्छाशक्ती सामर्थ्य कुठून प्राप्त होणार पण लेखिकेच्या वडिलांनी प्रोत्साहन दिले त्यामुळे ती शिक्षण घेऊ शकली. लेखिकेचे वडील जन्मदाता, मार्गदर्शक, संरक्षक, कैवारी, उद्धारक या व्यक्तीमुळे लेखिकेचा पुढील प्रवास ध्येयापर्यंत झाला. या जमातीमध्ये जातपंचायतीचे प्राबल्य परंपरेने चालत आले आहे. समाजातील कोणताही ‘वाद’ निवडण्यासाठी जातपंचायतीसमोर ठेवला जातो. जात पंचायतीचा निवाडा विना तक्रार मान्य करावा लागतो. मान्य केला नाही तर समाज वाळीत टाकतो. ही भयंकर रूढी या समाजात आहे.

गोपाळ जमातीचा भूतपिशाच्यावर प्रचंड विश्वास आहे. अमावस्या, पौर्णिमेला भूते भटकत असतात. संचार करत असतात. ती वेगवेगळी रूपे घेऊन येतात. पाण्याच्या ठिकाणी मावलाया असतात. अशी त्यांची समजूत असते. अमावस्या दिवशी मावलायांचा संचार असतो त्या लागतात म्हणून त्याच्यावर प्रचंड खर्च केला जातो. असे अंधश्रद्धेचे बरेच प्रसंग 'मरणकळा' मध्ये आले आहेत. लक्ष्मण गायकवाड म्हणतात की, "हिंदू धर्मात अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, जातीवाद हे मानवी मूल्यांना सतत घातक ठरत आहेत."[१] याचा प्रत्यय प्रस्तुत आत्मकथनात येतो. हा समाज अंधश्रद्धेच्या आहारी जातो आणि कर्ज काढून पोटाला चटके देऊन यथातथ्य विधी करताना दिसतो. या भटक्या समाजाकडे प्रचंड ताकद आहे. पण हे सर्व असंघटित विस्कळीत असल्याने आजही अज्ञान, अंधश्रद्धा, दारिद्र्य घेऊन जीवन जगत आहेत. आपल्याच माणसाचे दुश्मन होत आहेत. आपापसात जातपंचायतीच्या नावाखाली मारामाऱ्या करून जीवन दुस्तर व दु:खमय करतात.

गोपाळ जमातीत स्त्रियांच्या बाबतीत असणारा दृष्टिकोन कमालीचा परंपरागत आहे. या संबंधीचे नानाविध अनुभव अनेकविध घटना प्रसंगातून व्यक्त केलेले आहेत. लेखिका चारपाच वर्षाची असताना त्यांनी सांगितलेल्या अनुभवातून या समाजाचा दृष्टिकोन स्पष्ट करणारा आहे. त्या लिहितात. "म्या आता चार पाच सालाची झाली हुते तरी माझ्या पाठीवर मायला पोर सोर कायबी झालं न्हायं तवा आजी चुलते गुजरीला (मायला) काय बी होत नाय तिला कवर पाणी घालतूया घरात बरं बघत नव्हतं आन मलाबी मनायचे सपाट पाठीची हिच्या पाठीवर लेकरूबाळ काय हुत न्हाय. आन आमच्या दोघीनलाबी कोणी बर बघत नव्हतं!" मुलगा नाही मुलीच्या पाठीवर काही होत नाही. त्यासाठी दुसऱ्या लग्नाचा आग्रह धरणारे आणि मुलीला सपाट पाठीची म्हणून हिणवणारे हे जग परंपरागत दृष्टिकोनाचे आहे. हे दु:ख सहन करणारी ही माणसं यांचे इथे दर्शन घडते.

आपला राग संताप व्यक्त करण्यासाठी उणीव भरून काढण्याचे खोटे समाधान मिळविण्यासाठी दुर्बल घटक केवळ वाचिक प्रतिक्रिया (शिव्या) व्यक्त करतात. संघर्षाचे शस्त्र म्हणून ते शिव्यांचा वापर करतात. प्रतिस्पर्धी शिव्यामधील अश्लिलतेला भिऊन गप्प बसतात किंवा दुर्बलांना शारीरिक, आर्थिक किंवा सामाजिक नुकसान पोहचवू शकतात. सामान्यत शिव्या देणे हा असंस्कृतपणा व भेकडाची वृत्ती

मानली जाते. आत्महत्या करणे हीसुध्दा पलायनवृत्ती व दुबळ्याची प्रतिक्रिया मानली जाते. ज्यांच्यासाठी दुर्बल घटक हे पाऊले उचलतात ते लोक मात्र या उक्ती व कृती वृत्तीला टरकून राहतात. प्रतिष्ठेची झूल नसलेले मागासवर्गीय हे जाणूनच शिव्या देण्याची किंवा जीव देण्याची भाषा करतात. मात्र त्यांचा हा सारा खटाटोप केवळ मूलभूत गरजा भागविण्यासाठी असतो हे त्यातील कारुण्य असते. त्यांची निंदा स्तुती फक्त पोटासाठी असते. भटक्या गोपाळ जातीतील स्त्रीया भांडायला, शिव्या द्यायला फार तत्पर असतात. लेखिका एकदा म्हशी राखण्यासाठी जाते उन्हाळ्याचे दिवस जनावराला चारा नाही म्हणून एक गंजीची पेंढी चोरते अन् सालकरी गड्याच्या नजरेस पडते. तेव्हा तो तिला खूप मार देतो. तेव्हा लेखिकेची आई त्याला खूप शिव्या देते. 'मेल्याला लेकरूबाळ हाय का? त्याच्या हाताला रघतपिती फुटू. वाजुंटा हाय का? त्याचे हाताचे बोटं देवानं झाडे न्हाय काय?' अशा दु:खाच्या वेदनेच्या भरात शिव्या देताना दिसते. त्या कधी मधाळ बोलताना दिसतात. पाटलाने गोपाळांची सुटका करताच तुम्हीच आमचे मायबाप झालासा टायमाला पाटील' अगदीच असह्य झाले की धमकीही देताना दिसतात. गावातील लोक गोपाळांना बांधून मार देतात तेव्हा लेखिकेची आजी आणि काकू पाटलांना धमकी देतात. "आम्ही दोघीबी म्हाताऱ्या हायता आमच्या मानसास्नी सोडा न्हायतर आमी दोघी सासू-सुना तुमच्या हिरीत उड्या घालू आसं मनून त्या दोघी पाटलाच्या हिरीकडं पळाया लागल्या." "घाबरून पायाच्या अंगठ्याने जमीन टोकरणारी व तोंडातून आवाज न काढणारी दलित स्त्री नाही. आवाज टिपेला चढवून खड्या सुरात शिव्यांचा आणि आलंकारिक भाषेचा उपयोग करून चारचौघांत उत्तम भांडू शकणारी प्रसंगी मधाळ बोलणारी दलित स्त्री आहे"[१०] याचा प्रत्यय प्रस्तुत आत्मकथनात येतो. दलित स्त्रीच्या ठिकाणी व्यावहारीक शहाणपण अधिक आहे पण औपचारीक शिक्षणाच्या बाबतीत विचार करता दलित स्त्रियांच्यात साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प नव्हे, नगण्य आहे. मरणकळा मधील जनाबाई स्वत:च्या जीवनाकडे व समाजाकडे अंतर्मुखतेने पाहते. तिची संवेदनशीलता अतिशय तीव्र आहे.

**'भटक्या' मधील सामाजिक आणि कौटुंबिक चित्रण :**

आज इथं तर उद्या तिथं अशी पालं घेऊन म्हशीसोबत फिरायचे. भीक मागायची, डोंबाऱ्याचा खेळ करायचा, म्हशी भादरायच्या, काहीच मिळाले नाही तर चालता-चालता त्या दिवसाच्या पोटापुरती

चोरी करायची असे दिवस काढणाऱ्या गोपाळ या विमुक्त भटक्या जमातीच्या वाट्याला भटकंती आली आहे.

ज्या गावात जातील त्या गावात पाल ठोकण्यापूर्वी पाटलांकडे नावे नोंदवायची आणि सोबतच्या माणसांसह कुत्री, जनावरे यांच्या नोंदी करायच्या तीन दिवस तिथं थांबून पुढच्या गावाला जायचे, हे असे भटकंतीचे जीवन आहे. या संदर्भात कचरू ओंकार गिऱ्हे यांनी लिहिले आहे की, ''आजही आमची जमात भटकत हाये. त्या जीवनाला दिशा नाई. अशी किती दिस आमची जमात भटकत ऱ्हाईल हे समजत नाई. त्या जीवनाला स्थिरता मिळल की नाई हे काळच ठरविणार हाये.। आजून दु:खाचा वनवा संपला नाई घुरपुस चालूच हाय.पोत्याच्या पालामधील वाऱ्यामधी जीवन जगणारी जमात कधी स्थिर हुईल हे सांगण माझ्या हाती ऱ्हाई''[११] ही गोपाळ समाजाची वर्तमान स्थिती आहे.

गोपाळ जमात गटागटाने किंवा चार दोन पालं संगतीने भटकंती करीत असतात. गोलवाडी, गुंजलवाडी, शादुलवाडी, शिऊर, गुंजालवाडी, बीड, परंडा, खुलताबाद, खेर्डे अशा गावातून भटकंतीत आलेल्या अनुभवांचे गाठोडे म्हणजे 'भटक्या' हे आत्मकथन होय. एका गावात पाटलाकडे नाव नोंदवायला गेल्यावर आलेला अनुभव उद्वेग आणणारा आहे. किती लाचार जीवन आहे याचा प्रत्यय येतो. 'झापडं पडली बा पाटलाच्या वाड्यात भीत भीत गेला. पाटील बाजीवर बसले होते. त्यांच्या भवताल त्यांचे महिनदार बसले हुते! रामराम पाटील! म्या आपल्या गावात पोट भराया आलो हाये! तीन चार दिस आम्ही गावंदरीला उतरलो. पाटील पोटापाण्यामुळं मुशाफिरी टिपायला उशीर झाला बा. असं मनताच पाटील संतापला डोक्याची आग मस्तकाला गेली. 'तुह्या बापाचं गाव हाय का? मुशाफिरी का टिपलो ऱ्हाय? गावात चोरी चपाटी झाली तर तुमचीच नावं घेतली जातील. हे आयकून बा घाबरला जाऊन त्या पाटालाचे पाय धरले हे समदं म्या बघत हुतो जणू काय आमच्या जमातीला जगात कुठच थारा नाही पाखराला तरी थारा मिळतो पण आम्हाला कुठंच जागा नाही''[१२] असे या भटक्या जमातीला गावच्या पाटील लोकांच्या दबावाखाली अपमानित जीवन जगावे लागते. भटक्या विमुक्तांच्या आत्मकथन संदर्भात डॉ. प्रकाश खरात लिहितात. ''भटक्या जमातीचे जगणे व स्वराज्याची चाळीस वर्षे उलटूनही त्यांना भोगावी लागणारी आर्थिक सामाजिक गुलामगिरी यांचे एक दारूण चित्र उभे केलेले आढळते''[१३] डॉ.

प्रकाश खरात यांचे मत समर्पकच आहे. पशुंना जे स्वातंत्र्य आहे ते माणसासारख्या माणसाला नाही. पोटाच्या आगीपेक्षा नाव नोंदवायला महत्व आहे. या समाजाला कवडी मोलाचे जीवन जगावे लागते देशाला स्वातंत्र्य येऊन त्यांच्या नशिबी अजूनही भटकंती आहे. यांच्या जीवनाला स्थिरता तरी केव्हा येणार? हा प्रश्न उभा राहतो. अस्पृश्य लोकांना निदान गावाबाहेर राहण्यासाठी जागा असते. यांना या दिव्यातून वाटचाल करावी लागते. ''अस्पृश्यांना निदान हाडकी आहे. स्वत:ची घरे आहेत काहींना जमिनीही आहेत. कैकाडी हे उकिरड्यावर जगणारे याना घरे नाहीत आर्थिक स्थैर्य नाही सामाजिक प्रतिष्ठा राहोच सामाजिक स्थान नाही.''[१४] रमेश धोंगडे यांनी उपरा संदर्भात लिहिले असले तरी सर्वच भटक्या विमुक्त समाजाला तशा प्रकारचे जीवन जगावे लागते. प्रस्तुत आत्मकथनात याचा प्रत्यय येतो. अस्पृश्य लोकांना अडचणीवेळी सवर्णाकडून मागून घेता येते. तसा आधार पाठिंबा या भटक्या विमुक्त समाजाला नाही. गोपाळांना परंपरागत गुलामीच्या टाचेखाली दबून रहावेलागते. अशी मानसिकता असणारा हा भटका समाज त्याच्या असह्यतेचा, त्याच्या दारिद्र्याचा फायदा सवर्ण घेतो. त्याचे शोषण करतो मुशाफिरीला विलंब झाल्यामुळे पाटलाची म्हैस विना मोबदला घेता भादरून द्यावी लागते.

गोपाळ जमातीला अत्यंत लाचार जीवन जगावे लागते. भूक सतत त्यांचा पाठलाग करीत असते. भीक मागून आणलेल्या अन्नावर तर कधी म्हशी भादरून, कधी डोंबाऱ्याचे किंवा कसरतीचे खेळ करून, बरेचदा उपाशी राहूनच गुजराणा करणारी ही माणसं गावंदरीला रानावनात राहत सारे आयुष्य काढणारी ही अनिकेत मंडळी कष्टाचा योग्य मोबदला कधीच याना मिळत नाही, अशा अवस्थेत जगत असतात. कधी शिकार करून कधी कुत्र्याने गावातल्या आणलेल्या भाकरी खाऊन नदीला, ओढ्याला मासे पकडून यासाठी त्यांना काहीवेळा प्राणास मुकावे लागते लेखकाचे आजोबा घोरपड धरायला गेले आणि घोरपड म्हणून काळा डोंब्या नाग चावून तिथेच मरतात.

गोपाळ समाज आयुष्यभर दुसऱ्याच्या उष्ट्या खरकट्या विटलेल्या अन्नावर जीवन जगत असतो. 'भटक्या' मधील चित्रण पाहिल्यावर एक गोष्ट जाणवते ती म्हणजे त्यांच्या आयुष्यात दारिद्र्याची श्रीमंती प्रचंड स्वरुपात नांदते. भालचंद्र फडके यांनी ''दलित आत्मकथनांना दु:खाची अभंग गाथा म्हटले आहे.''[१५] भालचंद्र यांच्या मताचा प्रत्यय प्रत्येक आत्मकथन वाचताना येतो. या जमातीच्या नशिबी साधी

झोपडीही नाही. अस्पृश्यतेचा कलंक पाणी मागून शिळेपाके मागून आणावयाचे, ते घेऊन आयुष्यातला एक एक दिवस ढकलावयाचा यांचा उभा जन्म दुसऱ्याने दिलेल्या अन्नावर जात असतो. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य या मुलभूत गरजादेखील कधीच पूर्ण होत नाहीत. अशी यांची पशूपातळीवरील आयुष्ययात्रा असते. कधी भीक मागून तर कधी उकिरड्यावरील खरकटे खाऊन हे लोक दिवस काढतात. ही भीक मागत असताना विविध स्वरुपाच्या अडचणी सोसाव्या लागतात. लेखक भीक मागायला जातो आणि कुत्रा पायाचा चावा घेते. पायातून रक्त वाहते. आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे औषध मिळत नाही. जखमेत चुना भरून त्याचा दाह सहन करावा लागतो. पोटाची भूक शमविण्यासाठी लहानसहान चोऱ्या कराव्या लागतात. शेंदाडे, रताळे, तुरीच्या शेंगा, ज्वारीची कणसे अशा चोऱ्या करतात. लेखकाचे वडील अंधाऱ्या रात्री कणसाची चोरी करायला जातात. त्यांच्याबरोबर दुसरा गोपाळ असतो. तो मोकळ्या विहीरीत पडतो आणि मरतो. लेखक एकवेळ शेंदाडाची चोरी करतो. शेंदाड फोडून खात असताना शेताचा मालक येऊन डोक्यात दगड घालतो. मोठी जखम होते. रक्ताची धार लागते. बेशुद्ध होतो. अशा पोटासाठी चोऱ्या करत असताना भरपूर मार मिळत असे. जन्मल्यापासून मरेपर्यंत भूक भेडसावित असते. त्यांचे सारे आयुष्य जणू या भूकेने कुरतडून टाकलेले. पोटात भडकवलेली भुकेची आग शमविण्यासाठी सारे जीवन पणाला लावावे लागते. तरीही ती त्यांचा पाठलाग करीत असते. बुरशी आलेली शिळी भाकरीसुद्धा न भेटल्याचे उल्लेख येतात. दिवस दिवस नुसते पाणी पिऊन घालवलेले, मागून आणलेल्या अपुऱ्या अन्नावर दिवस ढकलेले, जे असेल ते पोटात ढकलून पुन्हा वणवण करणारे, साधी चतकोर भाकरी आणि आंबलेली भाजी मिळाली तरी समाधान मानणारे, भुकेपोटी रानामाळातील वस्तूंच्या चोऱ्या करणारे यांचे आयुष्य चित्रित झाले आहे. धार्मिक बारसं, लग्न, जत्रेचे विधी, मयत इ. सोडले तर यांना पोटभर ताजे असे अन्न उभ्या आयुष्यात दृष्टीस पडत नाही. म्हणून भुकेने घेतलेला माणुसकीचा बळी, भुकेमुळे आयुष्याची होणारी नासाडी म्हणजे गोपाळ जमातींचे जीवन होय.

भुकेप्रमाणे या लोकांना अंगभर कपडा मिळत नाही. चवीचे आयुष्य कसे असते यांना स्वप्नातही ते दिसत नाही. पायाखाली आधार रानावनाचा, माथ्यावर सावली आकाशाची घरामध्ये एखादे दुसरे गाडगे-मडके पांघरण्यास जुनाट मळलेल्या गोधड्या तीन दगडांची चूल फडक्यात गुंडाळलेले मीठ-पीठ

आणि तिखट. म्हशीच्या पाठीवर बसेल एवढा प्रपंच असतो. दारिद्र्याने पिचून गेलेल्या जमातीचे हे विदारक दर्शन मनाला अस्वस्थ करून टाकते. "एकाचवेळी आत्मदर्शन आणि समाजदर्शन एकाचवेळी आत्मबोध आणि समाज संघर्ष अशा सृजनशील द्वंद्वातून रूपास येणारी आत्मकथने ही सूक्ष्म व सखोल अभ्यास विषय आहेत."[१६] रा. ग. जाधवांचे हे मत आत्मकथनाच्या दृष्टीने योग्यच आहे कारण आत्मकथन एका व्यक्तीचे असले तरी ते अनुभव एका जात समाजाला येत असतात. म्हणूनच एकाच वेळी व्यक्तीदर्शन व समाजदर्शन घडते याचा प्रत्यय याही आत्मकथनात येतो. गोपाळ समाजातील एक व्यक्ती स्वत:विषयी लिहिते तेव्हा त्या समाजाचे सर्वसंदर्भ त्या व्यक्तीत असतात. त्या समाजाची ती प्रतिनिधी असते. प्रातिनिधीत्वाने ते निवेदन समाजदर्शनच असते.

**अस्पृश्यता व उपेक्षा :**

गोपाळ जमातीला अस्पृश्यतेचा कलंक आणि त्यातून होणारे बहिष्कृत जीवन यांचे दु:ख भोगावे लागते. या लोकांना गावात सहसा प्रवेश केला तर सवर्ण समाज त्यांना माणुसकीशून्य अशी वागणूक देतो. 'भटक्या'मध्ये नमूद केले आहे. कसाब खेड्यात मारवाड्याचं लग्न होते. तेथे भीक मागण्यासाठी जातात. पंगतीजवळ बाजूला उभे राहतात पण कोणीही अन्नाचा एक घास त्यांच्या भांड्यात टाकत नाहीत त्याठिकाणी त्यांना मार आणि भरपूर शिव्या मिळतात. "आमी उसटं पासटं पत्रावळीवरचं येचलं"[१७] तेच घेऊन पालावर यावे लागते. गोपाळ जमातीच्या मालाला वस्तुला कधीच योग्य दर दिला जात नाही. त्यांना बाजारात कोंबडे बकरे विकायला नेले तरी ते चोरीचे असेल म्हणून नगण्य किंमतीत घेतला जाते. एखाद्या कापडाच्या दुकानात कपडे घ्यायला गेले तरी चोर असावा या संशयाने पोलिसांच्या ताब्यात दिले जाते. विना गुन्ह्याचा मार घ्यावा लागतो. म्हणजे या लोकांनी चांगले खायचे नाही, चांगली किंवा नवीन वस्त्रे वापरायची नाहीत, आर्थिक विकासासाठी काही उत्पन्न काढायचे नाही. माणूस असून माणसासारखे वागले तर संशयी दृष्टीने हा सवर्ण समाज पाहतो. संशयाच्या टांगत्या तलवारीच्या धाकात जीवन घालवायचे भटक्या जमातीत जन्माला आल्यामुळे अशा कितीतरी अन्यायाला सामोरे जावे लागते. या जीवनाला मान प्रतिष्ठा तर कधीच वाट्याला येत नाही. आणि म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले असावे 'मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही'.

**अज्ञान व अंधश्रद्धा :**

गोपाळ जमातीमध्ये प्रचंड अज्ञान अंधश्रद्धा आणि भूताखेतांवर विश्वास असलेली ही जमात. चारी दिशाला जगण्यासाठी पांगलेली असली तरी यांचे दैवत सकलादीबाबा, मढीचे दैवत यांचा पूजाविधी नैवद्य करताना दिसतात. तसेच दसऱ्याचा सण उत्साहाने आणि धुमधडाक्याने साजरा करतात. सकलादीबाबा मढीचे दैवत यांना साकडे घालणे, नवस करणे, लेखकाचे वडील आजारी असतात तेव्हा त्यांची आई सकलादीबाबाला बकरा बळी देण्याचा नवस करते. मढीच्या यात्रेला जाणे, भूत पिशाच्च लागणे, लेखकाच्या आईच्या अंगात सोनाई भूताचा संचार होता किंवा सोनाई लागली होती. त्यासाठी मांत्रिक आणून ते काढण्याचे प्रसंग येतात. असे कितीतरी अंधश्रद्धेचे प्रसंग 'भटक्या' मध्ये येतात. प्रचंड अज्ञान, परंपरेचा पगडा अंधश्रद्धा यामुळे त्यांना अशा देवदैवतांवर श्रद्धा ठेवावी लागत असे. त्यामुळे कुणाचे बारसे असो, अंत्यसंस्कार असो, लग्न असो की, जातपंचायत असो या प्रत्येक वेळी बकरा कापणे, भरपूर दारू पिणे हे त्यांना आवश्यक वाटते. ही त्यांची धार्मिकता समजतात. अज्ञान या राक्षसाच्या कराल पंजात सापडलेल्या आणि शतकानुशतके पायदळी तुडवला गेलेला एक प्रचंड समाज या आत्मकथनातून प्रत्ययकारीपणे साकार होत असलेला दिसतो.

**कदान्न व अनारोग्य :**

गोपाळ जमात आरोग्यविषयक कधीच जागृत नाही. दुसऱ्याने दिलेल्या विटलेल्या अन्नावर जीवन जगणारा आहे. त्यांना समतोल आहार हा स्वप्नातही माहीत नाही. त्यांच्या आरोग्याविषयी विचार केला तर प्रचंड अज्ञान आणि दारिद्र्यच दिसते. शरीरावर जखमा झाल्या तरी त्यांना औषध मिळत नाही. जखमेत चुना भरणे, रॉकेल ओतणे याशिवाय ते काही करू शकत नाहीत. लेखक एक प्रसंग सांगतो "अंगाला लई ताप भरला माझ्याजवळ पाणी द्यायला मून कोणीच नव्हतं दवाखाण्यात जायला पैसा नव्हता... तीन दिस धरनीला उठलो न्हाय! पोटात तर कणभर आन्न न्हवतं तसाच नदीवर गेलो मुऱ्हा धरल्या... त्या खाल्या पर त्यानी थोडीच भूक जाते? आखीर जंगलाची वाट धरली... पोटभर बोरं खाल्ली"[१८] दारिद्र्यामुळे भुकेला कोंडा, झोपायला धोंडा अशी परिस्थिती या लोकांच्या वाट्याला येत असल्यामुळे ते समतोल आहार किंवा औषधोपचार करू शकत नाहीत.

**अभावग्रस्तता :**

'भटक्या' या आत्मकथनात गोपाल जमातीचे दर्शन घडते. ते शेकडो वर्षापासून ज्ञानाला वंचित असलेले. एकतर अस्थिर आयुष्य, मागासलेली अवस्था, भयानक दारिद्र्य, उदासिनता आणि व्यसनाधीनता यामुळे या जमातीला शिकणे म्हणजे आयुष्य बरबाद करून घेणे अशीच त्यांची धारणा झालेली आढळते. बरेच प्रसंग या आत्मकथनात आले आहेत. लेखकाच्या शिक्षणाला प्रथम वडील विरोध करतात कचरू गिऱ्हे पहिलीतून दुसरीत गेले आणि त्यांनी वडिलांना पुस्तकाची मागणी करताच म्हणतात की, "सडक्या तुला कुठून पैसे आणून पुस्तकाला. पुस्तकं बिस्तकं कायबी न्हाय. उद्यापासून तुही साळा बंद"[१९] कधी पुस्तकांसाठी विरोध तर कधी तो म्हशी सांभाळून शेर दोन शेर धान्याला मदत करीन म्हणून त्याला शाळा सोडायला सांगतात. त्यासाठी त्याला आणि आईला मारदेखील घ्यावा लागतो. त्यांच्यामते 'शिकला तो हुकला' ही त्यांची प्रवृत्ती. आई फक्त प्रोत्साहन द्यायची त्याने शिकावे, मोठे व्हावे, ही तिची इच्छा. लेखकाची आई म्हणते, "साळातून पळून येऊ नगस न्हाय तर मव्हं तोंड काळं करीन" "बा शाळा बडू नगं साळात जा... मह्या वाण्याची शाळा बुडाली"[२०] बिकट परिस्थितीला तोंड देत लेखक शिक्षण घेतो. पुढे एफ. वाय. बी.ए. ला असताना आईसुद्धा लेखकाच्या शिक्षणाला विरोध करू लागली. तीही म्हणते. "तुहे लहान लहान भावंडं हाय तुहं लगीन झाल्याबगर त्यांची लगीन कशी होत्याल? शिकला नसता तर बरं झालं असतं शिकला तितका हुकला"[२१] शिक्षणाने माणसाचा अंतरबाह्य कायापालट होतो. त्याचे विचार बदलतात सुधारणा होते. शिक्षण हे जीवनाकडे पाहण्याची नवीन दृष्टी देते. याची कल्पना नसलेली ही जमात सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक जीवनात पराकोटीची मागासलेली आढळते. तरीही काही आत्मकथनाच्या वाचनानंतर असे दिसते की, आई ही नेहमीच सहकार्य करणारी दिसते. मुलाने शिक्षण घेतले पाहिजे, अशी अपेक्षा करते त्यासाठी सर्वकाही ती सहन करत असताना दिसते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि प्रेरणा जितक्या झपाट्याने आणि विस्ताराने गावकुसाबाहेरच्या दलितांच्या झोपड्यामध्ये व पालांमध्ये पोहचल्या तितक्या झपाट्याने व विस्ताराने भटक्या जमातीत पोहचल्या नाहीत. अस्थिरता, दिशाहीनता, अज्ञान अशा कारणांनी समाजाच्या

वळचणीला नित्य असूनही समाजातील विकास धारेपँत तो पोहचू शकत नाही. शिक्षणाला समाजाचा विरोध होण्याअगोदर तो घरातच (झाडाखाली किंवा उघड्या माळावर) आईवडिलांकडून होतो. कित्येक आई-बापांच्या डोक्यापर्यंत शिक्षण हा विचार पोहचलेलाच नसतो. ज्योत लावण्याआधी विझलेली असते. पोटासाठीच फक्त येथे आग पेटलेली असते, त्याच्या उजेडात फक्त कष्ट आणि भीकेतून येणारे शिळेपाके तेही अपुरे अन्न दिसत असते.

**लेखक-लेखिकेचा सामाजिक दर्जा व कौटुंबिक जीवन साम्य :**

मरणकळा आणि भटक्या ही आत्मकथने समाजापासून सर्वच मूलभूत गरजांपासून उपेक्षित असलेल्या जमातीबद्दल आलेख काढणारीआहेत. ही दोन्ही आत्मकथने गोपाळ जमातीतील पती पत्नीची आहेत. या आत्मकथनात बऱ्याच घटना प्रसंगात साम्य आहे. ''ही आत्मकथने म्हणजे आतले आत ठसठसणाऱ्या जखमांनी विव्हळ झालेल्या मनाचे अस्वस्थ मनाने केलेली कथने आहेत.''[२२] असेच 'मरणकळा' आणि 'भटक्या' मध्ये घडून गेलेल्या भूतकाळाचे घायाळ करणारे वर्णन येते. भूतकाळातील तो आणि वर्तमान काळातील तो काहीसा स्थिरावलेला आत्मभान आलेला समाज आहे. यातून आत्मकथनाची निर्मिती झालेली आहे.

अन्न आणि भूक माणसाला कुठे नेऊन पोहचविल हे सांगता येत नाही. भूकेसाठी अन्नासाठी या गोपाळ जमातीला लाचार व्हावे लागते. मानसिक मरणे मरावी लागली. जीवावर उदारही व्हावे लागले. 'मरणकळा' मधील लेखिका सांगते, आजोबा जत्रेला जातात पहिल्या मुक्कामाच्या ठिकाणी आजोबा येतात तोपर्यंत पालांचा मुक्काम बदलतो. पालं नाहीत म्हटल्यावर संध्याकाळ झालेली आहे. अंधारात जायचे कुठे हा प्रश्न तेवढ्यात कोणी तरी भूताला तळीव मळीव ठेवलेले देणे दिसते. तेच घेऊन भूकेपोटी ते खातात आणि तिथेच मरतात. तसाच 'भटक्या' मधील लेखक प्रसंग सांगतात लेखकाचे आजोबा घोरपड म्हणून डोंब्या नाग धरतात. तो त्यांना चावतो अन्नाविना पाण्याविना त्यांना तेथेच भूकेपोटी मरावे लागते. सवर्णाच्या घरी लग्नकार्य सण असेल तर याना अत्यानंद होतो. सुसाऱ्यात पाटलाच्या पोरीच लग्न होते म्हणून लेखिका आणि इतर गोपाळ भीक मागायला जातात. दिवस गेला तरी कोणीच काही वाढत नाही. ''उकिरड्यावर जेवणाच्या उष्ट्या पत्रावळ्या टाकल्या तशा आम्ही धावलो. आम्ही एकीकडं वढीत

हुतो आनं कुत्रे एकीकडं वढीत हुते. तशीच उसटपासट सारी मिळून आपल्या भगुन्यात घेतलं.'' आणि पालाकडे आले. लेखिका म्हणते, ''भुकेला कोंडा आन उशाला धोंडा आज उस्टंपास्टं का होईना पर गोडधोड खायला मिळालं. माणसांच्या पंगतीला तर नाय पर कुत्र्याच्या पंगतीला बसून का हुईना गोडधोड खाल्लं हुतं.''[२३] तर 'भटक्या'मध्ये लेखक आणि एक गोपाळीण एका सवर्णांच्या लग्नात मागायला जातात. सवर्णांच्या शिव्या आणि मार घेतात. उष्ट्या पत्रावळीवरील अन्न वेचून घेऊन पालावर येतात. मार, शिव्या उष्ट का असेना पण अन्न खायला मिळाले याचा आनंद होतो. 'मरणकळा'मध्ये लेखिकेचे वडील आणि इतर गोपाळ कणसाची चोरी करतात आणि पोलिसांचा मार घेतात. लेखिका शाळेत असाताना सकाळी उठून भीक मागून विटलेले शिळे पाके आणायची आणि खावून शाळेत जायची. लेखकही भीक मागायला जायचा अंबुस झालेली भाकरी, मवा आलेली भाकरी मिळायची. भुकेसाठी, अन्नासाठी, खाण्यासाठी, धावपळ चोरी, मार, जखमा अशा प्रसंगातून त्यांच्या जगण्याची कल्पना येते. हृदयविदीर्ण करून टाकणारे प्रसंग हालअपेष्टांचे दैन्य आणि गुलामगिरीचे कंगाल जीवनाचे तसेच समाजपरिस्थितीचे दर्शन दोन्ही आत्मकथनात घडते. अन्नाच्या शोधात असणाऱ्या या माणसांना जगायचे कसे हा सतत भेडसावणारा प्रश्न आहे.

भुकेप्रमाणेच आणखी एक प्रसंग म्हणजे अंगाला वस्त्रदेखील भीक मागूनच घालावी लागतात. मरणकळामध्ये लेखिका वडिलांनी मागून आणलेली फ्रॉक पहाताच आनंदी होते. पुढे डी. एड. ला असताना साड्या मागून आणून त्याच्यावर डी. एड. करते 'भटक्या'मध्ये लेखक सांगतो ''अंगात मागून आणलेली किंवा जुन्यावाल्याकडून आणलेली बंडी असायची. चड्डीचा पत्ताबी नसायचा. बंडीवर समदं धकायचं फाटेस्तवर नेसायची''[२४] लज्जा रक्षणासाठी अंगाला अंगभर कपडा मिळत नाही. एवढे दैन्य यांच्या वाट्याला आलेले दिसते. अन्नवस्त्राची ही स्थिती तर निवाऱ्याची व्यवस्था कोणती चांगली असणार? निवाऱ्याची तर सतत उठाठेव करावी लागते. 'मरणकळा' मध्ये 'पोरी आमला तीन दिसा उपर एकाच गावात राह्याला मुभा नव्हती. ज्या गावात म्हशीला चारा पाणी दिसलं आणि आम्हाला घासकुटका मिळण्यासारखं गाव दिसलं त्याच गावाजवळ पालं ठोकायची.'' ''महा जन्म झाला त्यो गोधडीच्या पालात दगड मातीच्या थरांवर म्या झाले.''[२५] त्याचप्रमाणे 'भटक्या'मध्ये तीन दिवसांनी आडरानातून पाल

हलली तसचं तुला एका धडुक्यात बांधून मायनं पोटाशी धरलं तुह्याई ओली बाळंतीन असल्यामुळं चालनबी सुदरत नव्हतं''[२६] आजारपण बाळंतपणासारखी घटना असली तरी यांना आपला मुक्काम हलवावा लागतो. दर तीन दिवसाला वणवण हिंडावे लागते, यांचे जगणे म्हणजे दु:ख यात्रा आहे.

आरोग्यविषयक अशीच दयनीय असते. एखादी जखम झाली तरी औषध मिळत नाही. याचे कारण अफाट दारिद्र्य लेखिकेला जखम होताच जखमेत चुना भरला जातो. वडिलांना कुत्रे चावले की, गोपाळांना सवर्णांनी मारले की जखमेत चुना भरला जातो. हळद भरली जाते. हा त्यांचा उपाय तसेच 'भटक्या' मध्ये लेखकाला कुत्रे चावले, वडिलांना म्हशीचे शेपूट भादरताना तुटले म्हणून मारले तेव्हा चुना, हळद भरली जाते. पौष्टिक अन्न तर कधीच मिळत नाही. लेखिका आजारी पडते तेव्हा डॉक्टर ताजे अन्न, फळे खायला सांगतात. दयनीय परिस्थितीमुळे दवाखान्यालाच पैसे नसतात तर फळाला कुठून आणायचे? म्हणून वडील फळाची चोरी करतात. ती सापडते भरपूर मार मिळतो पाठीवर हळद घालण्यापलीकडे काहीच करू शकत नाहीत. 'भटक्या' लेखक तापाने आजारी पडतो. जवळ कोणीच नसते. नाथ असून अनाथ झालेला दवाखान्याला पैसे नसतात पोटाला अन्न नसते. अशा परिस्थितीत दुखण्याचे कौतुक करता येत नाही. तर पोटाची आग शमविण्यासाठी मासे आणि बोरे खातो असे नेहमी जीवनाच्या विरोधी परिस्थितीला सामोरे जावे लागते. अस्वच्छतेचे प्रंचंड साम्राज्य असते. ''माझ्या अंगात कटल्याला फाटल्याला फराक होता. डोक्याचा हात निघत नव्हता डोकं खाजून खाजून हाताची नखं बोटं मलानं माखली हुती. डोक्याला कवा फणी लागली नव्हती. डोक्याचा झाप झाल्याला. केसं गळ्यात लोंबत हुती. वाऱ्यानं भुरूभुरू उडत हुती. नाक पुसून-पुसून हाताचा वरचा भाग मातीत माखलेला आन नाकाला खारी''[२७] भटक्यांमध्ये ''मव्हा अवतार एखाद्या घाणीत भरलेल्या जनावरासारखा हुता. महिना महिना आंघोळीचा पत्ता नव्हता. कपडे तर अंगावरच फाटायचे''[२८] या समाजावर आरोग्यविषयक स्वच्छेतेविषयी कधी संस्कारच झाले नाहीत टापटीप राहणेही गोपाळ जमातीला मान्य नाही ही जमात कधी सुधारणार यांचे अज्ञान कधी संपणार हाच इथे मोठा प्रश्न आहे.

भटक्या जमातीमध्ये जातपंचायतीचे वर्चस्व इतर समाजापेक्षा जास्त असल्याचे जाणवते. जनाबाई गिऱ्हे आणि कचरू गिऱ्हे एकाच जामातीचे असल्यामुळे दोघांच्या वाट्याला जात पंचायतीच निर्बंध

आलेले आहेत. लेखिकेच्या शिक्षणाला प्रारंभ पाटलाच्या सांगण्यावरून होतो. तर लेखकाच्या शिक्षणाला प्रारंभ काकांच्यामुळे होतो. ''पोरगं लय चुनचुन बोलतं शाळात घातलं पाहिजे.''[२९] 'मरणकळा' मधील लेखिकेच्या शिक्षणाला जातपंचायतीचा कठोर विरोध आहे. ती शिक्षण घेते म्हणून तिच्या वडिलांचे पाल वाळीत टाकले जाते. तसेच गोपाळ जातीतील लोक विरोध करतात पण वडिलांच्या व शिक्षकांच्या प्रोत्साहनामुळे शिक्षण घेता येते तर भटक्यामध्ये लेखकाच्या शिक्षणाला वडिलांचा विरोध होता. आई, चुलता आणि सवर्ण समाजातील मगनबाबानी प्रोत्साहन दिले. शिक्षणासाठी जनाबाई आणि कचरू यांना अनेक समस्यांना निकराचा लढा द्यावा लागला आहे. तरीही त्यांनी शिक्षणाचा मार्ग सोडला नाही. यातच त्यांच्या जीवनाची खरी कसोटी पहावयास मिळते. शिक्षण घेत असताना स्कॉलरशिप मिळाल्याचे दोन्ही आत्मकथनात प्रसंग येतात.

दोन्ही आत्मकथनात प्रचंड अज्ञान आणि अक्षरशत्रूचे दर्शन घडते. 'मरणकळा'मध्ये लेखिकेला शाळेत घालताना मास्तरने जन्म तारखेची मागणी करताच ''आमच्याजवळ कशाची जन्मतारीख? आन कशाचं काय? मास्तर पोर पाच सालाची झालीया मला पक्क ध्यान हाय''[३०] 'भटक्या'मध्ये मास्तरने वय विचारले असता काका सांगतात ''नव दहा बारा वरीष''[३१] हे शिक्षण घेत असताना त्यांच्या दारिद्र्यामुळे शाळेतील मुलं त्यांना जवळ बसू देत नसत. त्यामुळे शाळेविषयी पहिल्यांदा भीती व निराशा दिसून येते पण वडिलांच्या भीतीमुळे लेखिकेला शाळेत बसावे लागते तर लेखकाला आईच्या भीतीमुळे शाळेत बसावे लागते.

भूतपिशाच्च आणि देवधर्म यावर त्यांची श्रद्धा व विश्वास आहे. 'मरणकळा' मधील लेखिकेची आई आजारी पडताच व म्हैस खुंट्यावर चक्रा घेते म्हटल्यावर लेखिकेचे वडील मांत्रिकाकडे जातात. मेंढी बळी देण्याचा विधी करतात. तसेच लेखकाच्या आईला बाहेरचे लागले. सोनाई लागली. ती घुमू लागली की वडील मांत्रिक घेऊन येतात. सोनाई नावाचे भूत काढण्याचा विधी केला जातो. दसरा सण दोन्ही आत्मथनात सारख्याच पद्धतीने साजरा केला जातो. भूक, अन्न, वस्त्र, आरोग्य, शिक्षण, जात पंचायत, अंधश्रद्धा हे प्रसंग सारखेच येतात. यावरून असे वाटते की, आपल्याकडील सामाजिक व्यवस्थेप्रमाणे माणूस हा समाजात व देशात जन्मत नाही तो जातीत जन्मतो. जातीत जगतो आणि जातीतच मरतो. इतर

कोणत्याही संदर्भापेक्षा त्यांचा जातीचा संदर्भ अधिक पक्का आणि वास्तव असतो. त्यातून बाहेर पडणे अशक्य होते. हेच धार्मिक आर्थिक सामाजिक प्रसंगामधून दिसून येते.

**लेखक-लेखिकेचा सामाजिक दर्जा, कौटुंबिकजीवन भेद :**

'मरणकळा' आणि 'भटक्या' ही दोन्ही आत्मकथन पती-पत्नीची आहेत. एकाच जातीत जन्माला आल्यामुळे तितकेसे भेद जाणवणार नाहीत असे वाटले तरीही 'व्यक्ती आणि वल्ली'[३२] या साहित्यकृतीप्रमाणे प्रत्येक व्यक्ती भिन्न प्रवृत्तीची प्रकृतीची असते. स्त्री आणि पुरुष हा भेद असतोच. जीवन जगत असताना वेगवेगळ्या परिस्थितीशी झुंज देत असते. यावरून काही भेद हे असणारच. 'मरणकळा' मधील लेखिकेच्या वडिलांचे व्यक्तीमत्व पाहिले तर अडाणी असूनही प्रगतीचा नेमका मार्ग त्यांनी ओळखलेला दिसतो. आपल्या जीवनामध्ये, परिस्थितीमध्ये आपल्या समाजामध्ये परिवर्तन करायचे असेल तर शिक्षण घेतले पाहिजे. आपल्याला जे जीवन भोगावे लागत आहे ते मुलांच्या वाट्याला येऊ नये असे त्यांना मनोमन वाटते. म्हणूनच मुलीला ते जबरदस्तीने शाळेत घालतात. आपले दारिद्र्य असले तरी मोठ्यांच्या सारखे राहून चालणार नाही. आहे त्याच परिस्थितीत शिक्षण घेतले पाहिजे, नव्हे ते शिक्षण घेण्यास मुलीस प्रवृत्त करतात. काहीवेळा जाणीव करून देत असताना तिला मारही देतात. मुलीच्या शिक्षणासाठी गोपाळ जमात आणि जातपंचायत कठोर विरोध करते. त्यांना वाळीत टाकते. तरीही मुलीचं शिक्षण बंद करीत नाहीत. उलट म्हणतात. "म्या तुला मास्तरीण करीन पर शिक, चांगली ऱ्हा पोरी"[३३] ते स्वत: समोर एक ध्येय ठेवतात आणि सर्वांचा विरोध स्वीकारून मुलीचे डी. एड. पर्यंतचे शिक्षण पूर्ण करतात. तिला स्वत:च्या पायावर उभे करतात. एक ध्येयवादी आणि परिस्थितीला निकराची झुंज देण्याचे सामर्थ्य त्यातून प्रकट होणारी क्रांती हे निश्चित विधायक आहे. तर भटक्यामधील लेखकाचे वडील ओंकार गिऱ्हे हे प्रथम कचरूला शाळेत घालतात आणि पाटी पुस्तक कुठून आणू? शिवाय मुलगा भीक मागून तुकडे आणतो. चार म्हशी राखून शेर दोन शेर धान्याला मदत करतो. यासाठी त्याची 'शाळा बंद कर' म्हणतात. त्यावरून सतत भांडण, आईला शिव्या आणि मार घ्यावा लागतो. आईच्या प्रोत्साहनामुळे तो शिकत राहतो. वडिलांचा मार आणि शिव्या घेतो. म्हणजे इथे एका कर्त्या माणसाची वाटचाल अंधाराकडून बकाल अंधाराकडे होताना दिसते. 'मरणकळा'मधील जनाबाई धाडसी आहे. एम्प्लॉयमेंटला

नाव नोंद करण्यासाठी जनाबाईचे वडील आणि जनाबाई पाथर्डीहून नगरला जातात. समाजकल्याण ऑफिसात अधिकारी ओळख दाखविल्याशिवाय नाव नोंद करायला तयार होत नाहीत, तेव्हा ती त्यांना म्हणते ''मग म्या मनाले साब हे माव्हा बा हाय. माव्ह नाव नोंदवा. आम्ही भिकारी आमच्या वळखीचं कोणबी न्हाय. नाव नोंदवायच नसलं तर आसं लिहून द्या की, मी भटक्या समाजाच्या मुलीची नाव नोंदवीत न्हाय''[३४] असे धाडस 'भटक्या'मधील कचरूच्या व्यक्तीमत्वात दिसत नाही. एकदा कचरू व त्याच्या पाठीमागून सायकलस्वार येत होता. त्याने सायकलला ब्रेकचा दाबला आणि तो खुजा असल्यामुळे जमिनीला पाय न टेकल्यामुळे पडला. नंतर उठून त्याने कचरूला दोनचार थोबाड्यात मारल्या खरे तर कचरूचा काहीच दोष नव्हता. तरीही त्याने सायकलस्वाराला एका शब्दाने विरोध केला नाही. माझी काय चूक? असा सुद्धा प्रश्न केला नाही. पुढे त्याचे शिक्षण चालू असताना धाकटा भाऊ वेगळा राहतो, तरीही तो प्रतिकार करत नाही. एकंदर शांत संयमीवृत्ती व भिडस्त दिसते. लेखिकेला एक कमी शिकलेले स्थळ येते. मुलगा मागणी घालताच नकार देते. वडिलांना सांगते माझ्या लग्नाची मुळीच काळजी करू नका एवढे डी. एड. पूर्ण झाले की, सर्व व्यवस्थित होऊन जाईल. प्रतिकार करण्याची वृत्ती त्याचप्रमाणे विचारी व धीर देण्याचे सामर्थ्य तिच्याकडे आहे. जातपंचायत लग्न करत नाही म्हणताच कचरुला शिव्या देतात. वाळीत टाकतात तरीही तो शांत असतो. नोकरीच्या यादीत पत्नीचे नाव नाही असे दुसऱ्याकडून कळताच कचरू गिऱ्हे निराश होतात. पण जनाबाईचा ठाम विश्वास आहे. ती ठामपणे सांगते यादीत माझे नाव निश्चित असणार त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी यादी पाहताच तिचे नाव होते. तिला नोकरी लागते. असे आत्मविश्वासाचे प्रसंग 'भटक्या' मध्ये येत नाही.

'मरणकळा'मध्ये जनाबाईच्या विचारी प्रवृत्तीचे दर्शन घडते वडील आजारी पडताच तिला शिक्षण बंद करावे लागते. काबाडकष्ट करावे लागते. परिस्थिती स्थिर होताच पुन्हा शिक्षणाला सुरवात करते. सासरी गेल्यानंतर गोपाळ समाजातील लोक तिला घालून पाडून बोलतात; तिला कोल्हाटीन म्हणतात; म्युनिसिपालटीत झाडू मारायला ठेवणार नाही असे म्हणतात या सर्व प्रसंगाना ती विचाराने आणि संयमाने तोंड देते. पाथर्डीचा एक मुलगा औरंगाबादला कोर्सला गेलेला त्याने कचरूला तिच्याबद्दल काही काही सांगितले की, लगेच विचार न करताच गुप्तपणे पडताळणी न करताच तिच्या वडिलांना हकीकत

सांगितली. चौकशीअंती सर्व खोटे ठरले. कचरूचा स्वभाव शांत, संयमी असला तरी पुरूषप्रधान संस्कृतीतील पुरूषी अहंकार नकळत आपोआप जोपासलेला दिसतो. विचार न केल्यामुळे त्याला तडा जातो. 'मरणकळा' मध्ये जनाबाईचा ॲक्सिडेंट होतो. त्यावेळी तिच्यापुढे मुलांच्या भवितव्याचा प्रश्न उभा राहतो. मुलांचे भवितव्य घडवायचे राहते की काय याच चिंतेत असलेली दिसते. तर 'भटक्या' मधील कचरू गिऱ्हेला बकाल अंधारात खोल चिखलात रूतत चाललेला आपला समाज ह्या समाजाला स्थिरता कधी येणार यांच्यातील हे काटेरी जीवनच कधी संपणार यांच्यात सुधारणा कधी होणार, हे दु:खाचे दैन्याचे दारिद्र्याचे जीवन कधी संपणार या प्रश्नाने तो व्याकूळ झालेला दिसतो. 'मरणकळा'तील नायिका घरट्यातील पिलांची चिंता करते तर भटक्यातील नायक अवघ्या गोपाळ जमातीच्या जीवनाची चिंता करताना दिसतो. गोपाळ जमातीत परिवर्तन स्थिरता यांची पहाट कधी येणार याची वाट पाहाताना दिसतो. यातील नायिकेची संकुचित भूमिका व्यक्त होते तर नायकाची व्यापक भूमिका व्यक्त होताना दिसते. पण ती केवळ वैचारिक पातळीवर राहिलेली दिसते आपल्या गोपाळ समाजाचे दैन्य दूर करण्यासाठी सामाजिक किंवा राजकीय पातळीवर काही धडपड करताना तो दिसत नाही यात बदल झाल्याचे जाणवते. पुढे मुलाखतीतून सामाजिक कार्य हाती घेतल्याचे सांगतात, यावरुन त्यांच्या तळमळीची व व्यापकतेची कल्पना येते.

**मरणकळा मधील लेखिकेच्या स्वभावाची वैशिष्ट्ये :**

दलित स्त्री म्हणजे दलितांमधील स्त्री त्यातही भटक्या गोपाळ समाजात जन्माला आलेली स्त्री 'मरणकळा' ही जनाबाई कचरू गिऱ्हे यांनी स्वअनुभवाची रेखाटलेली उत्तम कलाकृती आहे. स्वबरोबर तिचे वडील आप्तस्वकीय यांची चरित्रे-व्यक्तीचित्रे आलेली आहेत. मरणकळा हे भटक्या जमातीतील पहिल्या स्त्री आत्मकथनकार आहेत.

आठवणीतल्या बालपणाचा काळ दारिद्र्याशी झगडण्यात गेला. शेती नाही. पालात निवारा पोटासाठी दारोदार भीक मागणे खालच्या थरातले जगणे-भोगणे त्याप्रमाणेच त्या सामाजाची पीडित लाचार भाषा त्या भाषेतूनच लेखिकेने आपल्या बालपणाच्या जीवन चरिताचे निवेदन केले आहे. अत्यंत दारिद्र्य ना घर, ना निवारा अशा कुटुंबात नगर जिल्ह्यात पाथर्डी तालुक्यात सांगवी गावी लेखिकेचा जन्म

झाला. जन्मापासून भुकेने यांची पाठ पुरवलेली आहे. कळायला लागल्यापासून यांना भीक मागावी लागते. भीक मागून मिळेल ते शिळेपाके अन्न यावर पोटाची आग शमविणे. सण असला तरी अत्यंत दारिद्र्यामुळे दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागते. गोडधोड अन्नासाठी सण-समारंभ लग्नकार्य असेल त्याठिकाणी जाऊन आपली इच्छा पूर्ण करतात. ती पशूपातळीवर येऊन पूर्ण होत असते. सवर्णांच्या लग्नकार्यात जायचे उकिरड्या शेजारी थांबायचे उष्ट्या पत्रावळ्यावरील अन्न गोळा करायचे एकीकडे त्या उष्ट्या पत्रावळ्या कुत्री ओढतात तर दुसरीकडे ही लोक ओढत असतात. प्राणी व मनुष्य यातील भेद जो संस्कृतीने केला तो भूकेच्या अत्यंतिकतेत प्रकृतीने नाकारलेला दिसतो. पोटासाठी भटक्यांना जनावरासमान पातळी आली. भूक हे दुखणे अन्न त्यावर औषध अशा मूलभूत गरजेचा अनुभव लेखिका घेते.

**शिक्षणाचे आकर्षण :**

भीक मागायला गेलेल्या लेखिकेच्या बालमनात शाळेतल्या मुली पाहून स्वत:मध्ये व त्यांच्यामध्ये असलेल्या फरकाची पहिली जाणीव होते. त्याचबरोबर शाळेतल्या मुलींच्या जीवनाचे आकर्षण वाटते. वडिलांनी लेखिकेला शाळेत दाखल करायचे म्हटल्यावर त्या कल्पनेनेच लेखिकेला झालेला अनिवार आनंद लेखिकेने व्यक्त केला आहे. ''साळाचा दरवाजा दिसताच अंधारात एक वात मिणमिणत असल्यासारखी वाटत हुती.''[३५] अत्यंत दारिद्र्यात असलेल्या लेखिकेने शेणाची पाटी सोडून शिक्षणाची पाटी हातात घेतली. या तिच्या शिक्षणासाठी एकच एक असे गाव उपलब्ध नाही. जगण्यासाठी आईबाप गावोगाव भटकत असतात. त्याप्रमाणे लेखिकेची शाळा भटकत असते. प्राथमिक शिक्षण भटकत केले. पुढे माध्यमिक शिक्षणाच्यावेळी एक झोपडी बांधून आजी सोबत राहून भीक मागत शिक्षण घेतले. ऐन महत्वाच्या मॅट्रिकच्यावर्षी वडील आजारी पडतात. त्यामुळे एक वर्षे वाया गेले. पुढे परिस्थिती स्थिर होताच शिक्षणासाठी धडपड करून जोमाने अभ्यास करून मॅट्रीक उत्तीर्ण होते.

**शिक्षण संस्कारासाठी धडपड, झुंज :**

प्रथम सन्मार्ग अनुसरला की, बाकी सर्व गोष्टी प्राप्त होतात. शिक्षणाने आलेले शहाणपण त्यातून ती पुढे डी. एड. होते. नोकरी लागते. सुखी जीवन जगायला लागते हे तिच्या सन्मार्गाचे प्रतीकच म्हणावे

लागेल. पण या शिक्षणासाठी तिला अनेक दिव्यातून जावे लागते. या तिच्या शिक्षणासाठी गोपाळ जमातीच्या विरोधाला प्रतिकूल परिस्थितीला निकराची झुंज द्यावी लागली आहे. लेखिका शिकते म्हणून गोपाळांनी त्यांच पालं वेगळे टाकले. शहरात शिक्षण घेते, स्वच्छ राहते म्हणून तिला कोल्हाटीन म्हणतात. गोपाळ जमातीच्या कुळाला ही कलंक लावेल म्हणतात. पण लेखिका आणि लेखिकेचे वडील जाणकार होते केवळ भीक मागणे आणि काम करणे या आधारावर समाज जीवन उभे राहीले तर पशुत्वाच्या दिशेने आपण चाललो आहोत आणि त्याचा शेवट अभाव, दु:ख आणि मानवी शोकांतिकेत होईल त्यासाठी ज्ञान प्राप्त करून घेतले पाहिजे हे लेखिकेने आणि तिच्या वडिलांनी जाणले असावे त्यामुळेच गोपाळांच्या निंदेला त्यांनी समर्थपणे तोंड दिले असावे. त्यांच्यातील बदल म्हणजे प्रगतीच्या दिशेने होणारी वाटचाल आहे. त्या समाजाची क्रांतीची मशाल आहे.

**स्पष्टवक्तेपणा, धाडसीपणा व झुंजारवृत्ती :**

पोटासाठी निसर्ग, समाज आणि नियती या तिन्ही पातळ्यांवर झगडण्याचे बाळकडू मिळाल्याने लेखिकेचा स्वभाव धाडसी व स्पष्टवक्तेपणा प्राप्त झालेला दिसतो. एम्प्लॉयमेंटला नाव नोंद करायला गेल्यानंतर संबंधीत व्यक्ती नाव नोंद करण्यास नकार देते. लेखिका स्वत:ची सत्य परिस्थिती सांगते. तरीही नकार मिळतो. मग मात्र ती गप्प बसत नाही. ती म्हणते भटक्या जातीची नाव नोंदणी करीत नाही असे मला लेखी द्या. तिचे ते धाडसाचे व्यवस्थित बोलण्याची पद्धत पाहून नाव नोंद केले जाते. शिक्षणाने माणूस विचारी व धाडसी बनतो हे लेखिकेच्या कृतीतून दिसते. लेखिकेला काही स्थळे येतात पण आपल्या जीवनाला अनुरूप योग्य नाहीत असे वाटताच ती नकार देते. वडिलांना समजावून सांगते. तुम्हाला दु:ख होईल असं काही करणार नाही. असे ती आश्वासन देते. परंपरेचा पगडा झुगारून देऊन जे योग्य आहे त्या वाटेने जाण्याचा तिने प्रयत्न केला आहे. मुलीला शिक्षण देण्यामागील वडिलांची भिती आणि स्वहित जाणून लेखिका अत्यंत जाणतेपणाने आपली भूमिका बजावते. तिने केलेली कृती निश्चितच फलदायी आहे, गोपाळ समाजाला नवा आदर्श देणारी आहे.

**कष्टाळूपणा :**

लेखिका कोणतेही काम करण्यास तयार असलेली दिसते. भीक मागण्यापासून शेणी गोळा करण्यापर्यंत शेतात ढोर कष्ट करणे, म्हशी राखणे, गवत कापणे, गवत आणणे अशी सर्व प्रकारची कामे ती करताना दिसते. ती कोणतही काम चांगल वाईट मानत नाही. वाट्याला आलेल्या परिस्थितीला सामोरे जाण्याचा आटोकाट प्रयत्न करते. वडिलांच्या घरी काहीवेळा अन्नाविना उपासमार होत असे. पुढे सासरीही तीच परिस्थिती. भांडण करणं विभक्त होणे या गोष्टी तिला पसंत नाहीत. घरात शांततेचे वातावरण ठेवण्याचा प्रयत्न करते. त्यासाठी कितीही कष्ट करावे लागले तरी ती करत राहते. तक्रारीचा सूर सहसा तिच्यात दिसत नाही.

लेखिकेचा बालवयापासूनच मनमिळावू स्वभाव आहे. त्यामुळेच प्राथमिक शिक्षणाच्यावेळी केळकरबाई तिला दुपारच्या सुट्टीत इकडे-तिकडे भटकण्यापेक्षा आपल्या घरी आश्रय देतात. लेखिका त्यांच्या मुलात रमून जायची. लग्न झाल्यानंतर घरात नंदा, जाऊ, सासू यांच्याशी मनमोकळेपणाने, मनमिळावूवृत्तीने राहते. पुढे छावणीत राहायला गेल्यानंतर घरमालक त्यांच्या मुली, सुना यांच्यातील संबंध अगदी घरातल्यासारखे होते. या सर्वातून त्यांच्या प्रेमळ मनमिळावूवृत्तीचे दर्शन घडते.

लेखिकेकडे जबरदस्त आत्मविश्वास आहे. लेखिकेचे लग्न ठरते आणि मुलाकडील लोक लग्न लांबणीवर टाकू लागली. गोपाळ जमात नाव ठेवू लागली. 'आता पोरगी फसवेल' असं काहीही बोलू लागली तेव्हा ती वडिलांची समजूत घालून सांगते आता माझ्या लग्नाची काळजी करू नका. मी. डी. एड. झाल्यावर नोकरी लागेल.त्यांना चिंता मुक्त करण्याचा प्रयत्न करते. आधार देण्याचे कार्य करते. नव्हे तशी तिची वाटचाल असते. हे सर्व ती आत्मविश्वासाने सांगते. पुढे लग्न झाल्यानंतर नोकरीच्या यादीमध्ये तिचे नाव नाही असे समजताच पती निराश होतो. अंथरून धरतो हे लेखिकेला समजताच त्यांची समजूत घालते व आत्मविश्वासाने सांगते नोकरीच्या यादीमध्ये माझे नाव निश्चित असणार. तुम्ही स्वत: जाऊन खात्री करून घ्या. दुसऱ्या दिवशी यादी पाहताच पती ऑर्डर घेऊन येतो.

दारिद्र्याचा संसार सावरण्याची जीवनात होणाऱ्या परवडीला, संपविण्यासाठी, गोपाळांच्या कुचेष्टित बोलण्याला कृतीने उत्तर देण्यासाठी तिचे 'लक्ष्य' फक्त नोकरी केव्हा लागते. याची ती आतूरतेने

वाट पहात असते. स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी अर्थाजनासाठी तिला नोकरी हवी असते. त्यामुळेच ती कन्नड तालुक्यातल्या 'रेल' सारख्या अगदी दूर डोंगराच्या गावी अवघडलेल्या परिस्थितीत जायला तयार होते. काही गावातल्या लोकांचा एवढ्या दूर जाण्यास विरोध असतो. पण लेखिकेला ऑर्डरमधील रेल गाव दिसत असते.

गोपाळ समाजातील एक सुशील मुलगी गोपाळ जमात म्हणजे अज्ञान अंधकारात बुडालेली आहे. जबरदस्त रूढी परंपरेचा पगडा असलेली जमात आहे. त्यांना मुलीने दारोदार भीक मागितलेली चालते पण शिक्षण घेतलेले चालत नाही. शिक्षण घेणे म्हणजे कुळाला बट्टा, कलंक लावणे, शिक्षण घेणे म्हणजे कोल्हाटीन होणे. शिक्षणाने मुली बिघडतात. असे त्यांचे समज आहेत. गोपाळ जमातीच्या गैरसमजाना गुंडाळून ठेवून शिक्षण घेऊन सुरक्षित होऊन स्वावलंबी झाले आहे. गोपाळ जमातीच्या कुळांना कलंक न लावता जिद्दीने आपलं मानाचे स्थान मिळविले आहे. गोपाळ जमातीतील गैरसमज निरर्थक आहेत हे सिद्ध करून दाखविले आहे. शिक्षणासाठी गोपाळ जमातीशी करावा लागलेला संघर्ष येणाऱ्या प्रत्येक अडचणीशी ती समर्थपणे झगडते लेखिकेची ही अंधाराकडून प्रकाशाकडे असलेली वाटचाल निश्चितपणे गोपाळ समाजात परिवर्तन करणारी आहे. स्फूर्तीदायक आहे. पुढे तिच्या आदर्शामुळे अनेक आईबाप आपल्या मुलीला भीक मागायला लावण्यापेक्षा शिक्षण देतील. भीक न मागता लाचार न होता युगानुयुगे मळलेल्या वाटेने न जाता काट्याकुट्याचा मार्ग पसंत करतील. लेखिकेची शिक्षणाची जिद्द ध्येय निश्चित गोपाळ समाजाला प्रेरणादायी ठरणारे आहे.

**संमजसपणा :**

लेखिकेच्या घरात पतीशिवाय बाकी सर्वजण अडाणी आहेत. त्यांना सांभाळून घेण्याचा ती वेळोवेळी प्रयत्न करते. प्रचंड दारिद्र्यामुळे घरात जीवनावश्यक वस्तुंचाही अभाव आहे. तशाही परिस्थितीत हेही दिवस जातील निघून असा पतीला आधार ती देते. सासू किंवा इतर गोपाळ लोक काही म्हटली तरी पतीला सांगत नाही. पतीला, वडिलांना दु:ख होईल असे प्रसंग ती टाळते. पुढेही दोघेही नोकरीला लागल्यानंतर लेखिकेच्या पतीच्या हाताचे हाड मोडते तेव्हा ती देवाला प्रार्थना करते. घरातील

आर्थिक परिस्थिती बिकट त्यातच सासू मुलाला काही काही सांगते. पती तिला घर सोडून जाण्यास सांगतो पण ती जात नाही येथे मनुस्मृतीत सांगितलेल्या वचनाची आठवण येते.

''पिता रक्षति कौमार्य रक्षति यौवने ।

पुत्राश्च स्वविरे भावे न स्त्री स्वांतत्र्यपमर्हति ।''[३६]

पती हेच जीवन आहे. हीच आपली जीवननिष्ठा आहे. या श्रद्धेने ती वावरताना दिसते. पुराणात आणि इतिहासात किंवा भारतीय संस्कृतीत पतिव्रत्य म्हणजे पतीला सर्व कामात मदत करणे, पतीशी कायावाचामनाने एकरूप होणे अशीच तिच्या मनाची धारण आहे.

**आशावाद :**

एक सुसंस्कारित माता अठराविश्वे दारिद्र्याचे चटके लेखिकेने भोगले आहेत. यातून ती आपली उन्नती करून घेते घरामध्ये शांतता सुखी समृद्ध वातावरण निर्माण करते. शाळेतील आणि घरातील मुलांवर संस्कार करण्यात मग्न असते पण आयुष्य एवढे सरळ नसते. नियतीची अशुभवेळ तिच्यावर प्रहार करते. तिचा ॲक्सिडेंट होतो. तिचा आत्मविश्वास डळमळतो आता आपण वाचणार नाही. आपण खूप अपराधी आहोत मुलांना जन्म दिला आणि मुलांच्यावरती संस्कार करायचे राहून जातात, मुलांचे भवितव्य घडवायचे राहते की काय अशा तिला शंका येऊ लागतात. ती चिंताग्रस्त होते. आपण गेलो तर मुलं रानोमाळ होतील. ती आईच्या मायेला पारखी होतील. पोटासाठी भाकरीची भीक कोणीही झोळीत घालतील पण मायेची भीक झोळीत कोण घालणार असेच सतत तिला वाटत राहते पण ॲक्सिडेंटमधून ती चांगली होते. आता ती मुलांच्या पदरी संस्काराची शिदोरी घालण्यासाठी सज्ज आहे. भटक्या विमुक्त जमातीमधील स्त्री जीवनाचे विदारक दाहक वास्तव घेऊनच अवतरले आहे. 'जीवन आणि मरणाच्या सीमारेषा जिथे अस्पष्ट होत गेल्या आहेत अशा अनुभूतीचे हे आत्मकथन आहे.''[३७] असे 'मरणकळा' या आत्मकथना संदर्भात लुलेकर म्हणतात ते योग्यच आहे. जनाबाई गिऱ्हे दलित, भटक्या जमातील स्त्री आहे. तीही समाजात शोषली, भरडली गेलेली, पिळली गेलेली सतत राबणारी नवऱ्याच्या सुरुवात सुख

मानणारी, अहोरात्र त्याची सावलीसारखी सोबत करणारी व मुलाबाळांची संसाराची काळजी घेणारी आहे. तिने विदारक अशा समस्यांशी संघर्ष केला आहे. कायम आशावादी दृष्टिकोन असलेली दिसते.

**'भटक्या' मधील कचरू गिऱ्हेने स्वभाव विशेष :**

भटक्या आत्मकथनासंबंधी कचरू गिऱ्हे लिहितात की, "रानावनात भटकताना आज इथ तर उद्या तिथं असं जगणं मीही भोगलेलं होतं. म्हशीच्या पाठीवर आणि स्वत:च्या पाठीवर बिऱ्हाड बांधून धावणारा माझा समाज आणि माझ्या आईवडिलांची भटकत्या भयानक बिकट बेभरवशाच्या जीवनकळांची झळ मलाही आतून-बाहेरून करपवून गेली होती. निसर्गाशी झुंज देत उथळलेली सैरावैरा झालेली चिखलात रुतलेली पावसात भिजून अवकळा आलेली गोपाळ समाजाची बेघर असलेली, कळाहीन पालं मी पाहिली होती."[३८]

अशाच पालात लेखकाचा जन्म झालेला आहे. भटक्या दिशाहीन तुच्छ समजल्या जाणाऱ्या आणि मायभूमीने व खेड्यापाड्यांच्या गावकुसांनी वाळीत टाकलेल्या गोपाळ समाजाच्या सर्व प्रकारच्या दु:ख यातनांचे ओझे आणि गाठोडे लेखकाच्या पदरी जन्मत:च बांधले आहे. अशा बालपणाच्या दारिद्र्यात जगलेल्या भोगलेल्या आठवणीतून साकार झालेली कचरू गिऱ्हेंची व्यक्तीरेखा.

दु:ख, दैन्य, दारिद्र्य, ना निवारा, ना शेती, भीक मागणे आणि आला दिवस घालविणे असा यांचा जीवनक्रम दोन तपाच्या घडामोडीचे विवेचन 'भटक्या' या आत्मकथनात लेखकाने निवेदन केले आहे.

ज्या ठिकाणी म्हशीला चारा आणि पाणी मिळेल त्याठिकाणी तीन दिवस पालांचा मुक्काम करणे. तीन दिवसाने दुसऱ्या मुक्कामाच्या शोधात अशीच यांची हयात जात असते. जीवनाला स्थिरता नसल्यामुळे हा समाज युगानुयुगे अज्ञान अंधकारात जीवन जगत असताना दिसतो. शिक्षण घेणे म्हणजे वाया जाणे, शिक्षण घेणे म्हणजे बरबाद होणे, शिकला तो हुकला. अशीच या समाजाची समजूत आहे. लेखकाला काकांनी शाळेत घातले. शाळेसाठी मार दिला आणि शिक्षणाची गोडी निर्माण झाली. 'शाळाची संगत जडली थोडी तरी जिवाची वणवण थांबली."[३९] इथेच लेखकाला शिक्षणाचे महत्व पटू

लागले शिक्षण घेतले पाहिजे. शिक्षणाशिवाय प्रगती अशक्य आहे. बालपणातच शिक्षण घेण्याचे शहाणपण आलेले दिसते.

**शिक्षणासाठी धडपड :**

बालवयातच लेखक मागून आणलेले शिळे भाकरीचे तुकडे घेऊन शाळेची वाट धरतो. आईवडील गावोगावी पोटासाठी भटकतात. पण लेखक गोलवाडीला एकटाच राहतो. ना निवारा, ना आश्रय सकाळी संध्याकाळी भीक मागायची ओढ्यावर नदीत अंघोळ करायची, दिवसभर शाळेत जायचे रात्री शाळेच्या वऱ्हांड्यात निद्रा अशा प्रतिकूल परिस्थितीत शिक्षणाला प्रारंभ होतो.

भटक्यांचे दारिद्र्य म्हणजे भूक आणि भिकेच अतूट नाते. जन्मापासून पाठीमागे लागलेली भूक, या भूकेपायी भीक मागणे, पोटासाठी चोरी करणे, म्हशी भादरणे, डोंबाऱ्याचे खेळ करणे, काबाडकष्ट करणे अशा परिस्थितीत लेखक शिक्षण घेत आहे. तरीही लेखकाच्या शिक्षणाला वडील विरोध करतात. या शिक्षणासाठी आईला व लेखकाला वडिलांचा मार घ्यावा लागतो. शिक्षणावरून भांडणे झाली की रात्री सर्वच कुटुंबाला उपाशी झोपावे लागते. या सर्व विरोधाला लेखक न जुमानता शिक्षण चालूच ठेवतो काही झाले तरी शिक्षण बंद करायचे नाही असा त्याचा विचार होता. तो ध्येयवादी जिद्दी असल्यामुळे किती परिस्थिती प्रतिकूल आली. समस्या निर्माण झाल्या तरी त्याला तो सामोरा जातो. तो जिद्दी आणि ध्येयवादी वृत्तीचा आहे. अनेक संकटाशी तो एकाकी झुंज देतो. वडील वारल्यानंतर सर्व जबाबदारी त्याच्यावर पडते तरी शिक्षण बंद करत नाही. स्वबळावर शिक्षण घेतो. आणि पुढे शासकीय सेवेत रुजू होतो.

**कष्टाळूवृत्ती :**

शिक्षणासाठी आणि प्रगतीसाठी वाटेल त्या प्रकारचे श्रम किंवा कष्ट करण्याची त्याची तयारी आहे. म्हणूनच तो भीक मागण्यापासून ते शिंदुळ्या गोळा करण्यापर्यंत, म्हशी राखणे, म्हशी भादरने, गवत आणणे, मासे पकडणे, म्हशी वाट्याने घेणे, दूध विकणे, सुयापोती विकणे, विहिरीत खोदकाम करणे, खदानीवर काम करणे, दगड फोडणे, शेतात काम करणे, करमणूकीचा खेळ करणे, पुस्तक बायडिंग करणे, भाजीपाला आणून देणे. अशाप्रकारची अनेक कष्टमय कामे करत दारिद्र्याचे चटके सहन करत तो शिक्षणासाठी धडपत असतो.

हा लेखक प्रतिकूल परिस्थितीला विदारक स्वरूपाच्या दु:खाला कधीच शरण जात नाही. उलट या दु:खाला दु:खी करण्याचे मानसिक धैर्य, सामर्थ्य त्याच्याठायी आढळते. लेखक शाळेत असताना आजारी पडतो. दवाखाण्यात जाण्यासाठी पैसे नाहीत भीक मागून आणल्याशिवाय अन्न नाही. पाण्याचा तांब्या द्यायला जवळ कोणी नाही भयंकर अंगात ताप अशा परिस्थितीत स्वत: ओढ्यावर मासे पकडणे; खाणे, बोरे खाणे केवढे धैर्य असे भयान आणि भीषण दारिद्र्य समाजाची वाईट वागणूक भूक तर सतत पाठलाग करते. या भुकेचे प्रसंग मनाला अस्वस्थ करणारे आहेत. लेखकाच्या अनुभवाला आलेले किती तरी प्रसंग या आत्मकथनात येतात. मवा आलेली भाकरी, मित्राकडून चोरून आणलेली भाकरी, कधी पोटासाठी शेंदाडाची चोरी, कधी नुसती बोरे, शेंगा, तादंळीची भाजी असे भुकेचे प्रसंग येतात त्यातून दु:ख निर्माण होते. ''अस्पृश्यतेच्या जोडीने असलेले सर्वव्यापी दारिद्र्य आणि तज्जन्य भूक हेही दु:खाचे कारण असते.''[४०] असे कवठेकर म्हणतात. याचा प्रत्यय याही आत्मकथनात येतो. दु:ख हे या आत्मकथनाचा स्थायीभाव आहे. अनेक नाट्यपूर्ण प्रसंग या मगरमिठीतून सुटका होणे कठीण असले तरी परिस्थितीशी चिवट झुंज देत जीवनाला सामोरे जातात.

हा लेखक समजूतदार संयमी आहे. तितकाच अबोल बंडखोरवृत्तीचा अभाव असे लेखकाच्या स्वभावाचे विशेष 'भटक्या'मध्ये प्रकट होतात.

**'मरणकळा' आणि 'भटक्या' या आत्मकथनकारांचा स्वभाव साम्यभेद :**

दारिद्र्य, दैन्य व दु:ख यामधून व्यक्त झालेले जीवन त्यातून प्रकट झालेले स्वभाव विशेष थोड्याफार फरकाने सारखेच आहेत. या दारिद्र्यातून प्रतिकूल परिस्थितीशी शिक्षणासाठी केलेली धडपड दोन्हींमध्ये सारखीच वाटते. लेखिकेकडे जबरदस्त आत्मविश्वास आहे. तेवढा लेखकाकडे वाटत नाही, कींचित अबोळपणा जाणवतो. लेखिकेच्या ठिकाणी स्वकुटुंबा विषयीची तत्परता जाणवते लेखकाला सर्व गोपाळ समाजाच्या दु:खाची यात्रा कधी संपेल याचा ध्यास लागलेला दिसून येतो.

**'मरणकळा' मधील जीवन संघर्ष :**

मरणकळा ही आत्मकहाणी संघर्षाने भरलेली आहे. हे आत्मनिवेदन अनेक पदरी दु:खाचे निवेदनच ठरावे. दु:ख एका व्यक्तीचे आहे ती व्यक्ती म्हणजे जनाबाई गिऱ्हे यांची व्यक्तीवैशिष्ट्ये

महत्वाची आहेत. ही व्यक्ती ध्येयवादी, आत्मविश्वासू धाडसी झुंजार असा स्वभाव असलेली आहे. तिच्याठिकाणी हा ध्येयवाद नसता तर दु:ख राहिले असते. पण ते संघर्षाला आपल्यापर्यंत पोहचलेच नसते. शतकानुशतके गोपाळ जमात म्हैशीच्या पाठीवर प्रपंच घेऊन आज इथं तर उद्या तिथं बिनतक्रार निमूटपणे फिरत आहे. त्याप्रमाणे भिकाऱ्याचे जिणे ही सुद्धा जगत राहिली असती. पण तिला निराळे काहीतरी घडावयाचे होते. या संघर्षाचे पाच पदरी रूप आहे. झुंज देणारी जनाबाई ही इतरांपेक्षा वेगळी असली तरी तिच्याही वाट्याला येणारे दु:ख आहे. या आत्मकहाणीतील जनाबाईचा जन्म पाथर्डी तालुक्यातील सांगावी गावी दगडामातीत होतो. पण ती गोपाळ जमातीतील विशिष्ट मुलगी राहिली नसून ती जगाच्या पाठीवर दलित जीवन जगणाऱ्या गोपाळ जमातीची प्रतिनिधी बनली आहे. तिचे दु:ख, तिचा संघर्ष हा समग्र दलितांचा आणि गोपाळ जमातीचा आहे ही वेदना पाचपदरी संघर्षातून आलेली आहे. दैन्याशी लढा. घरातल्या गोपाळ आणि जातपंचायत प्रवृत्तीशी लढा, दलित समाजाला दलिततेरांशी द्यावा लागणारा लढा, निसर्ग आपत्तींशी करावा लागलेला संघर्ष त्याचप्रमाणे पंचम संघर्ष नियतीशी निकराची झुंज द्यावी लागली आहे.

सर्वच दलित समाजाप्रमाणे गोपाळ जमातीत जन्मलेल्या जीवांना भाकरीसाठी लाचारी पत्करण्याचा प्रसंग येतो. 'दलित साहित्यातील अनुभव हा आजवरच्या साहित्यात व्यक्त न झालेला अनुभव आहे.''[४१] गोपाळ समाज प्रस्थापित समाजापासून दूर रानावनात भटकत असतो. सर्वच बाबतीत हा उपेक्षित आहे. त्याला साहित्य तरी कसे अपवाद असू शकेल? गोपाळांच्या जीवनाचे चित्र आजवर रेखाटले नाही. त्यांचे अनुभव म्हणून वेगळे आहेत. कळायला लागल्यापासून वडिलांबरोबर अन्नाची भीक मागावी लागली आहे. तिने चार घरचे अन्न विटलेलं, फसफसलेलं घेऊन पालावर येऊन आईवडिलांसोबत खाल्ले आहे. सतत अन्नासाठी वणवण करावी लागली आहे. वणवण करून लाचारी पत्करून काही वेळा उपाशी राहण्याचा प्रसंगही आला आहे. ज्ञानाच्या भुकेने पोटाच्या भुकेने जो संघर्ष उभा राहिला त्यातून लेखिकेने शहाणपण घेतले ज्ञानाच्या भुकेसाठी शाळेत जायचे. पोटाची भूक आणि ज्ञानाची भूक यांचाही संघर्ष पोटाच्या भुकेसाठी भीक मागणे त्यासाठी मार मिळतो. म्हणून मनाला आवर घालायचा. लेखिका शाळेत जायला लागल्यानंतर जगायच्या जिद्दीने टीचभर पोटाच्या आगीने शाळेतून

पळून जाऊन अंगावरच्या वस्त्राची झोळी करून गावातून जे मिळेल ते घेऊन नदीवर आणलेली भाकरी खायची. त्यामुळे शाळा बुडायची. मास्तरांनी हे तिच्या वडिलांना सांगितले तेव्हा वडिलांनी तिला खूप मारले. परत माराच्या भीतीने कितीही भूक लागली तरी शाळा बुडवून भीक मागायला जायची नाही. पोटात मात्र भुकेचा आगडोंब व्हायचा भीतीपोटी का होईना मनाने शहाणी होऊन भुकेला आवर घालण्याची सवय लागली. शिक्षण घेतले पाहिजे असे वाटू लागले. अन्न, वस्त्र, निवारा यांची गरज भाविण्यासाठी पशूसुद्धा बरा. इतकी वाईट अवस्था गोपाळ समाजाची असते. गावोगाव फिरणे हा आपला धर्म असल्याचे लहान वयातच उमजलेले. ''पोरी आमाला तीन दिसा उपर एकाच गावात राहयला मुभा नव्हती''[४२] अशी माहिती आजीने दिली या भटकंतीला अजूनही घर मिळाले नाही. जेथे मुक्काम असेल तेथे भीक मागायची आणि खायचे. लेखिकेची चुलती एका गावात भीक मागायची आणि खायचे. लेखिकेची चुलती एका गावात भीक मागायला जाते आणि येतायेता शेताच्या कडेची एक काटी उपसते तेवढ्यात शेतावरील काम करणारा गडी पाहतो. आणि तिच्या डोक्यावरचे शिळ्यापाक्या भाकरीचे गाठोडे फेकून देतो. तिच्या अंगाशी झटतो. लज्जा रक्षणासाठी जीवाच्या आकांताने ती ओरडते. आवाज ऐकून पालावरच्या इतर गोपाळणी धावत येतात. त्याच्या पाया पडतात. 'मालक सोडा चुक झाली, तिचा नवरा लय वाईट आहे' अशा विविध प्रकारे विनवणी करतात पण तो सोडायला तयार होत नाही. मागून तिचा नवरा येतो. आणि त्याच्या पाठीत काठी घालतो. ही वार्ता गावात कळताच सर्वच सवर्ण काठ्या, बांधाट्या घेऊन गोपाळांना मारायला येतात. ''मारामारा ह्या भिकाऱ्यांना! लई माजले कोणी म्हनत होते. त्याची पालं जाळा''[४३] सवर्णांनी सर्व गोपाळांना झोडपून काढले. शेवटी पाटलाने मध्यस्थी करून पाले लगेच उचलायला सांगितली. 'नाही तर मी माझ्या हाताने काडी लावून पालं पेटवून देईल' असा जबरदस्त दम दिला. काळोख पडला होता. गोपाळांना जखमा झाल्या होत्या. रक्त गळत होते. असह्य वेदना बरोबर घेऊन रातोरात पालांचा मुक्काम हलवावा लागतो. पोटात भुकेचा डोंब अंगावर काठ्याबांधाड्याचा मारा घेऊन दुसऱ्या गावाच्या शोधात निघावे लागले. या समाजाला जणू कुठेच थारा नाही. त्यांचा विचार करायला कोणाला बुद्धी आणि वेळच नाही अशा उपऱ्या जीवनाला सतत सामोरे जावे लागते.

पोटासाठी लेखिकेचे वडील आणि इतर गोपाळ कणसाची चोरी करायला जातात आणि शेत मालकाला सापडतात तो त्यांच्यावर पोलीस केस करतो पोलीस पकडून नेतात खूप मार देतात. इथून पुढे मात्र पोलिसांनी गाव सोडायचा नाही, नाही तर हद्दपार करीन म्हणून धमकी दिली. पहिल्यांदाच एका गावात पंधरा दिवस राहयला मिळाले. पुढे लेखिकेला शाळेत घातली पण भीक मागितल्याशिवाय पोटाला अन्न मिळत नसे कधी भीक मागून तर कधी नुसत पाणी पिऊन कधी उपाशी राहून दिवस काढावे लागतात. मुलभूत गरजाही न भागविणारी गरीबी किती वाईट असते हे 'मरणकळा' अभ्यासताना पानोपानी अनुभवास येते. खाण्याचे हाल होत असत पण इतरही फजिती भरपूर होते. याप्रमाणे दैन्यामुळे येणाऱ्या परिस्थितीशी लेखिकेला व गोपाळ जमातीला संघर्ष करावा लागला. निकराची झुंज देत ती आपले शिक्षण चालू ठेवते.

जनाबाईला प्रेमळ आईवडील लाभले आहेत. ती त्यांची एकुलती एक मुलगी आहे. लेखिकेचा चुलत भाऊ विष्णु याला शाळेत घालायचे ठरते तेव्हा लेखिकेच्या वडिलांच्या मनात विचार येतो. आपल्या मुलीला शाळेत घालावे पण आई व इतर गोपाळ विरोध करतात. "ते का पोरगं हाय का? मून चाल्ला साळात घालाया ओ बो काय ठालं दे कवतीक"[४४] पण वडिलांच्या आग्रहामुळे तिला शाळेत घातले जाते. पुढे मुलगी शिक्षण घेते, म्हणून जातपंचायत वडिलांचे पाल वाळीत टाकतात, मुलगी शिकते म्हणून दंड मागतात. पण तरीही ते जातपंचायतीचा आदेश मोडून तिचे शिक्षण चालू ठेवतात. ती शिकत असल्यामुळे तिला गोपाळ जामातीतील स्त्रिया कोल्हाटीन म्हणतात. ती शहरात शिकायला जाते की धंदा करून घर चालवते असेही म्हटले जाते. पण त्यांच्या टीकेकडे लक्ष न देता लेखिका आपले शिक्षण चालूच ठेवते. तिच्या लग्नासंबंधी गोपाळ जमात नाव ठेवते. लेखिका या सर्वांना संयमाने तोंड देत असते. पुढे लग्न झाल्यावरही गोपाळ जातीच्या टीकेतून मुक्तता होत नाही. सुशिक्षित असल्यामुळे स्वच्छतेचे संस्कार झाल्यामुळे टापटिपीत राहत असल्यामुळे सासरीही चंद्राची सून कोल्हाटीन म्हणून गोपाळणी सासूचे कान भरत असतात. त्यातच पतीला आणि तिलाही नोकरी नसल्यामुळे गोपाळ लोक निंदा करतात. यांना म्युनिसिपालटित झाडूवाल्याची सुद्धा नोकरी मिळणार नाही असे म्हणत. नोकरी नसल्यामुळे घरात खाण्याची चणचण एकीकडे समाज मनाने कोसळायला लावतो तर दुसरीकडे अन्नाविना कोसळण्याची

पाळी येते. मूल आजारी पडले तरी औषधाला पैसा मिळायचा नाही. अशा किती तरी असह्य जीवघेण्या प्रसंगांशी लेखिकेला संघर्ष करावा लागला आहे. हृदयावर आघात होण्यासारखे प्रसंग आले तरी न डगमगता तिने ही काट्याकुट्याची वाटचाल केली उपासमार कशी तरी पाणी पिऊन निभावता आली. पण गोपाळांची मानसिकता भावनिकता सापासारखी विळखा घालून बसलेली होती. तरी त्याला धाडसाने संयमाने धैर्याने सामोरे गेल्याचे दिसते. नाही तर जनाबाई नावाचे फूल उमललेच नसते. तिच्या वाट्याला इतरांच्या प्रमाणे शतकानुशतके कंगाल जीवन वाट्याला आले असते. हे संघर्षाविना घडत नाही असेच म्हणावे लागेल.

सवर्ण समाजाकडून मिळणारी तुच्छ वागणूक ही एखादा शाप मिळावा तशी जन्मापासून तिचा पाठपुरावा करीत आलेली आहे. सुसाऱ्यात एका पाटलाच्या पोरीचे लग्न होते काहीतरी मिळेल या आशेने ती जाते तेव्हा ''भिकार्डे, कार्टी पला इथून मून हाकलायची''[४५] लेखिकेला शाळेत घातले आणि सवर्णाची बाई मास्तरांना सांगून गेली ''भिकाऱ्याच्या पोरीला आमच्या पोरीच्या शेजारी बसवू नका'' तसे मास्तराने सर्वांच्या पाठीमागे बसवले. पुढे ही डी. एड. ला असतानाही गोपाळाची आहे हे कळताच संशयीत नजरेने बघत असत. गोपळ जात म्हणजे फासेपारध्याप्रमाणे चोरी करतात. लेखिकेच्या आजोबाला देखील भीक मागायला गेल्यावर चोर म्हणून बांधून ठेवल्याचे लेखिका सांगते. असा अस्पृश्य म्हणून त्यांचा अनन्वित छळ करण्यात आला सवर्ण समाजाने त्यांच्या स्वाभिमानाचे आणि कष्टाचे शोषण केले तरी त्यांनी निकराची झुंज दिलेली दिसते.

या गोपाळ जमातीला गरीबीचे जीवन जगताना जातपंचायतीच्या बंधनकारक रूढींशी व सवर्णांशी जीवन जगताना लढा द्यावा लागतो. त्याचप्रमाणे निसर्गातील अवर्षणाला सामोरे जावे लागते. लेखिका शाळेत जाते तेव्हा पावसाळ्याच्या दिवसात ओढे नाले पार करून येते. झोपडीची ती अवस्था तर काय संपूर्ण झोपडी पाण्याने भरलेली, अंथरून-पांघरून जळण सर्वच पाण्याने ओलेचिंब, ओल्या कपड्यात अन्नाविना रात्र काढावी लागते. असे प्रसंग वर्षानुवर्षे येत असतात.

नियतीशी लेखिकेला झगडावे लागले आहे. ऐन मॅट्रिकच्या वर्षी वडील आजारी पडतात. आणि शाळा बंद करण्याशिवाय इलाज नव्हता. काबाडकष्ट करून वडिलांना औषधे देऊन बरे करावे लागते.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

शाळा बंद झाल्यामुळे मनात निराशा त्यातच गोपाळ तिला नको त्या प्रकारची स्थळे सुचवू लागली असे मन उद्ध्वस्त होणारे प्रसंग आले पण वडील बरे होताच ब्राह्मण मेहंदळेबाई यांना परीक्षेस बसण्याची परवानगी मागितली त्यांनी योग्य सल्ला दिल्यामुळे दुसऱ्यावर्षी तरी परीक्षेला बसता आले. फॉर्म भरून मॅट्रीक परीक्षेत पास झाली. बिकट परिस्थिती पार करत डी. एड. पर्यंतचे शिक्षण केले. लग्न झाले नोकरी लागली आणि आता सुखाने दोन घास घेत असतानाच पतीला विजेचा शॉक बसला प्राणावरचे संकट हातावर गेले हात फॅक्चर झाला. सगळ्याच गोपाळणी ती सासरच घर सोडून छावणीत आल्यामुळे हे घडले म्हणू लागल्या. हाताच्या दु:खातून सावरते ना सावरते तोच तिचा ॲक्सिडेंट होतो. त्यात ती जबरदस्त जखमी होते. जगण्याची आशा कमीच पण त्यातून ती वाचते. आता काठीचा आधार घेऊन शिक्षिकेची नोकरी करते. अशा किती तरी संकटांशी तिला संघर्ष करावा लागतो. ''आत्मकथनं ही आपल्यावर समाजाकडून झालेल्या अन्यायाची कैफीयत मांडण्यासाठी लिहिली जातात.''[४६] हे मराठे यांचे म्हणणे योग्यच आहे. मरणकळा ही तीव्र वेदनेची कहाणी आहे. दलित मनाला आलेले विदारक अनुभव उपरेपणाचे दु:ख, भुकेचे दु:ख, शिक्षणाच्या अडचणी, जातीचे दु:ख तिच्या वाट्याला आलेले दिसते. त्यामुळे लेखिकेने शिक्षणाची अविचल वाट धरली असावी. त्यामुळे पंचम संघर्ष करून भटक्या जातीत पहिल्या स्त्री आत्मकथनकार हे नाव सार्थ केले असे म्हणावे लागेल.

**भटक्यामधील जीवन संघर्ष :**

स्वत:ला घडवत असताना कचरू गिऱ्हेंना ज्या जीवघेण्या यातना सोसाव्या लागल्या त्याचे अत्यंत संयमित भाषेत ते वर्णन करतात. प्रकाशाच्या दिशेने झेपावणाऱ्या व्यक्तिमत्वाचा हा जीवन प्रवास एका धगधगत्या समाज मनांचाही प्रवास आहे. अंधार युगाकडून प्रकाशाकडे निघालेली ही एक यात्रा आहे. पण ही यात्रा सुखयात्रा नाही काहीतरी आत्मक्लेश भोगावे लागले आहेत. या आत्मक्लेशांचे अनेक पदर आहेत. या आत्मकथेतील एक एक प्रसंग त्या आत्मक्लेशाचे जणू एक एक अंग उलगडून सांगणारा साक्षीदार आहे.

हातावरचे पोट म्हशीच्या पाठीवर प्रपंच घेऊन दाहीदिशा भटकत राहणारी ही जमात आहे. बारामहिने यांना पोट नेईल तिकडे फिरत राहवे लागते. ज्या गावात जाईल त्याठिकाणी मुशाफिरी टिपणे

बंधनकारक आणि पाटलाचे वागणे ही स्थिती कुण्याही माणसाला उद्वेगजनक ठरेल अशीच असते. तीन दिवस थांबण्यासाठी नोंद करायची आणि या नोंदीसाठी पाटलाचे पाय धरायचे नोंद झाली नाहीतरी पोलिसांची भीती असे लाचारीचे जीवन गोपाळ जमातीच्या वाट्याला आलेले आहे. त्या अपमानाचे अनुभव लेखकानेही भोगले आहेत.

अन्न ही माणसाची अत्यावश्यक गरज आहे. त्यासाठी माणसाला आत्मसन्मान विसरावा लागतो. कमालीचा संघर्ष करावा लागतो. आणि दारिद्र्यात तर माणूस भाकरीच्या चक्रात फिरत असतो. लेखकाचे भुकेचे अनुभव दाहक विदारक आहेत लेखकाचे वडील, आई ते स्वत: संपूर्ण गोपाळ जमात दररोज पोटाची खळगी भरण्यासाठी संघर्ष करीत असतात. त्यांचे आजोबा घोरपड पकडण्यासाठी बिळात हात घालतात आणि सापाच्या दंशाने मरतात. हा जिवघेणा अनुभव भुकेपायी या कुटुंबाला येतो. शाळेत असताना स्वत: लेखक मधल्या सुट्टीत गोलवाडीच्या आसपासच्या शेतातून तुरीच्या शेंगा, शेंदाड चोरून खातात,. त्यासाठी त्यांना मार घ्यावा लागतो. शेतात काहीच नसले की शिंदीच्या झाडाचा गाभा खावा लागतो, कुठे लग्नाच्या ठिकाणी भीक मागायची काही मिळाले नाही तर उकिरड्यावर फेकलेल्या उष्ट्या पत्रावळीमधून कुत्र्यांबरोबर संघर्ष करीत अन्न गोळा करायचे. उदरनिर्वाहाचे साधन नसल्यामुळे पोटासाठी कराव्या लागणाऱ्या अनेकविध संघर्षाची अनुभवांची मालिकाच या आत्मकथनात प्रकट होते. भीक मागण्याशिवाय दुसरा मार्ग नाही. वर्गातील मित्रांनी दिलेली भाकरी कोरडीच खातात, सवर्ण मित्र विष्णु यांच्या घरी जेवण्याच्या वेळी त्यांच्या घरी जायाचो मग मगनकाका म्हणायचा, 'भाकर खाऊन घे पोरा' म्या लई दाबायचे''[४६] असे प्रांजळपणे सांगतात पोटासाठी डोंबाऱ्याचा खेळ करणे असा जीवाचा आटापिटा करीत जीवन जगावे लागते. आपल्या जीवनातील अमूल्य वेळ केवळ पोटाची खळगीत शिळेपाके तुकडे भरण्यासाठी ते मिळविण्यासाठी या लोकांना घालवावा लागतो. खेळाचा आनंद निसर्ग सौंदर्याचे दर्शन घेण्यातील आनंद अंगची कला कसरत दाखविण्यातील आनंद काही सुंदर चांगले अनुभवण्याचा आनंद घेण्यासाठी त्यांच्याकडे पैसा आणि वेळ दोन्हीही नसतात. हलकी जात म्हणून ही समाज दूर धुडकावतो. प्रामाणिकपणे कष्ट करावे तर संशयाने पाहणारे कामही मिळू देत नाहीत. पैसा, प्रतिष्ठा, वेळ आणि

मालकीचा भूमीचा पायापुरता तुकडा त्यांचा नसतो. अभावग्रस्त हे त्यांच्या जीवनाचे विशेषण. सर्व सुखापासून सर्व स्थिरतेपासून यांचे जीवन वंचित असते.

जीवन बदलण्यासाठी शिक्षण महत्वाचे आहे. पण गोपाळ या भटक्या विमुक्त जातीमध्ये शिक्षणाची कोणतीही परंपरा नाही. ''आमच्या बाच्या पिढीनं शाळा बघितली नाय.'' ''पाटी पुस्तक बाला काय म्हाईत. फक्त म्हशी नीरपनं, चार घरं मागून खाणं आन भाड्याच्या बैलासारखं राबनं इतकचं माहीत''[४८] सतत भटकणाऱ्या सर्वच जमातीमध्ये शिक्षणाची परंपरा असू शकत नाही. शाळेत जाण्यासाठी कुटुंब एकाठिकाणी स्थिर असावे लागते. पण गोपाळ समाजाला स्वत:चे गाव नाही. त्यामुळेच शाळेत नाव घालताना शिक्षकाने विचारले.'' आपण पालं बिलं तर हलविणार नाय ना? तवाच नाव घालतो?''[४९] कसा तरी शाळेला प्रवेश मिळतो पण पुढे त्याला अनाथाचे जीवन जगावे लागते. आईवडील पोटाच्यामागे भीक मिळेल तिकडे हिंडत असतात तर कचरू गिऱ्हे याला शाळेपायी गोलवाडीला ना घर, ना निवारा, ना अंथरून पांघरून, ना पोटाला अन्न प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घ्यावे लागते. कधी भीक मागून तर कधी उपाशी राहून शिक्षण घेत असतात, भाव आहे पण देव नाही तसे नाव आहे पण गाव नाही, जात आहे पण पात नाही, भीकेसाठी दार आहे पण राहण्यासाठी घर नाही. जमात भटकी जिंदगी फाटकी इतकी की, ठिगळ कुठे लावताच येत नाही.

लेखकाला शिक्षण घेत असताना दारिद्र्याशी सतत संघर्ष करावा लागला आहे. कुणाच्या शेतात काम करणे, दूध विक्री व्यवसाय करणे, मित्राच्या वडिलांची मदत घेणे, शिक्षकांची मदत घेणे, प्राध्यापकांची मदत घेणे, कॉलेजमध्ये खड्डे काढणे, अशी जी मिळतील ती कामे करणे. शिक्षण घेत असतानाच जातपंचायत लग्नाचा आग्रह धरते शिक्षण पूर्ण झाल्याशिवाय लग्न करणार नाही म्हणताच जातपंचायत त्यांच पालं वेगळे टाकते त्यामुळे जातपंचायतीचा आणि आईचा रोष घ्यावा लागतो. हे सारे सहन करून शिक्षणासाठी मन पक्क करून लग्नाला नकार दिला.

अभ्यासाला पुस्तके नसायची पण त्रासातून शिक्षण करायचं हा निर्धार होता. अभावग्रस्त परिस्थितीत संघर्ष करीत आंतर्बाह्य ताण-तणाव सहन करीत त्यांनी शिक्षण घेतले.

फाटक्या-तुटक्या पालातून जीवन जगणाऱ्या या भटक्या जमातीला या समाज व्यवस्थेने भटकणे, दारिद्र्य अपमान, छळ याशिवाय काहीच दिले नाही. उलट छोट्या-छोट्या कारणावरून व कधी कारण नसताना या व्यवस्थेने अत्याचार केला. भीक मागायला उभे राहिले म्हणून मारहाण, कापड दुकानात गेल्यावर संशयाने पोलिसात तक्रार आणि पोलिसांकडून मार, शेंगा, शेंदाड चोरून खातो म्हणून मारहाण, नाव पाटलाकडे नोंदवले नाही म्हणून शिव्या आणि दम हे नित्याचेच अत्याचर कसाबखेड्यात मारवाड्याच्या घरी असलेल्या लग्नात काही चांगले खायला मिळेल म्हणून लेखक आणि अनसाबाई भीक मागायला जातात. पंगती उठत असतात. ''जसा एक लोभा आला तसा अनसाईच्या पेचकात लाथ घातली खंपल खंपल मेले मेले पळ पळ अनसाई वरडू लागली. म्याबी जोरात धुम ठोकली''[५०] या समाजाला मर्दानगी करण्यास प्रतिष्ठा नसते. न्याय मागण्यास समाज आपला नसतो जीव वाचविण्यासाठी जीव घेऊन पळणे हीच मर्दानगी असे ह्या आत्मकथनात जाणवते. हे जीवन पाहिले की नामदेव ढसाळांच्या कवितेची ओळ आठवते. ''स्वातंत्र्य कोणच्या गाढवीच्याच नाव'' देशाला स्वातंत्र्य मिळून ५६ वर्षे झाली तरी पूर्वीप्रमाणेच प्रस्थापित वर्गाच्या हातात शेती, कारखानदारी या भटक्यांना राहण्यापुरतीसुद्धा जागा नाही. त्यांचे प्रश्न व अस्पृश्यता आजही टिकून आहे. लोकशाही असूनही माणसाला मानसन्मान सत्ता-संपत्ती प्रतिष्ठा मिळत नाही. व्यक्तीविकास व समाजविकास करता येत नाही. घाम गाळूनही भूकेकंगाल रहावे लागते. पायाखालच्या जमिनीसाठी डोक्यावरच्या छप्परासाठी किती यातायात करावी लागते आहे याचे विदारक दर्शन घडते. समाजात लोकशाही जीवनाची मूल्ये रुजलेली नाहीत तर ही लोकशाही केवळ वरवरची जुजबी स्वरूप असलेली आहे असेच म्हणावे लागेल.

अशा अनेक संकटांना सामोरे जात असतानाच नियतीशी त्यांना निकराची झुंज द्यावी लागली आहे. शिक्षण घेत असताना सर्प दंश होतो. तसेच पाण्याच्या डोहात बुडण्याचा प्रसंग येतो; त्यातच वडिलांचा मृत्यू त्यामुळे कुटुंबाची सर्व जबाबदारी सांभाळत शिक्षण घ्यावे लागते. भुकेशी, दारिद्र्याशी, जातपंचायतीशी, सवर्णांशी आणि नियतीशी संघर्ष करत नेटाने जोमाने त्यांनी उच्चशिक्षण पूर्ण केले ते आज लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत.

**लेखक लेखिकेचा जीवन संघर्ष : साम्यभेद :**

भटक्या आणि मरणकळा या दोन्ही आत्मकथनातील लेखक-लेखिकेला साधारणत: सारखेच जीवनासक्तीचे संघर्ष आले आहेत. त्यातल्या त्यात 'मरणकळा'मधील लेखिका एक स्त्री म्हणून आणि त्यातही दलित स्त्री आणि त्यांच्याच समाजाने केलेला अन्याय छळ व जातपंचायतीशी दिलेली झुंज ही भटक्यापेक्षा लेखकापेक्षा निश्चितच भयानक आहे. हे मान्य करावे लागेल. "आपण जे जीवन जगलो ते अत्यंत निर्भिडपणे व मुक्तपणे व्यक्त करणारी दलित स्त्री आत्मकथने म्हणजे मराठी आत्मकथनाला गवसलेली एक नवी दिशाच होय"[५१] असे संपादकीय प्रस्तावनेत म्हटले आहे याचा प्रत्यय 'मरणकळा' या आत्मकथनात येतो. गोपाळ कुटुंबसंस्था, स्त्री-पुरूष यातील द्वंद्व रुढीदास्य, जातपंचायतीची बंधने, पुराण मानसिकता यातून नव्या मानसिकतेची झालेली वाटचाल या आत्मकथनातून दिसून येते. दुसऱ्या शब्दात सांगायचेच झाले तर महात्मा फुल्यांनी मुलींची शाळा सुरू केली. स्त्री संस्काराचे व स्त्री जागृतीचे बीज पेरले. त्यांच्याच प्रेरणेने जातपंचायतीने अनेक बंधने घातली ती बंधने तोडून लेखिका स्वत:च अस्तित्व सिद्ध करते. आपल्या भारतीय संस्कृतीत स्त्री ही परावलंबी परप्रकाशी दुर्बल मानली तरी ती सुद्धा स्वयंप्रकाशी होऊ शकते. हा म. फुल्यांनी मांडलेला विचार तिने सिद्ध केला आहे. असे वाटते.

**सौ. जनाबाई कचरू गिऱ्हे यांची मुलाखत**

**१) <u>आपण शिक्षण घेत असताना विषमता, अस्पृश्यता या संदर्भात थोडीशी विस्तारित माहीती सांगा?</u>**

- मी शाळेत असताना जातीभेद, विषमता होती यात शंका नाही. श्रीमंत, गरीब, उच्च-निच्चता, अस्पृश्यता या चालीरिती होत्याच. मागासवर्गीच्या मुला-मुलींनी शिकावे, मोठे व्हावे असे उच्चवर्णीयांना वाटत नसे. कारण खेड्यातून पोटासाठी आपले लोकही पाटील, सरपंचाच्या घरी कामाला ठेवत असत. मग आपणच शाळेत गेलो तर त्यांची पडलेली कामे, कमी पैशात कोण करणार? दुसरी गोष्ट म्हणजे मागासवर्गीयांना शिक्षणाची आवडही नसे. कारण शिक्षणासाठी पैसा व वेळ पाहिजे असतो तो मागासवर्गीय लोकांकडे नव्हता.

अस्पृश्यतेबद्दल सांगायचे झाले तर देवघरात नव्हे तर घराच्या आतही मागासवर्गीयांना प्रवेश नव्हता. तांब्यात पाणी दिले तर पाणी पिल्यानंतर तांब्या पालथा घालून त्यावर विस्तव ठेवत असत. जेव्हा तो तांब्या सुकेल तेव्हा तो घासून मगच घरात घेत असत. बागायतदारांच्या शेतावर कामासाठी मळ्यात गेलो तर दुपारी जेवायला बसलो की, भाजी किंवा पाणी दुरूनच वाढले जात असे.

२) **<u>शिक्षण घेण्यासाठी वडिलांचे प्रोत्साहन होते हे उघडच आहे. पण आणखी कोणाचा तुमच्यापुढे आदर्श होता?</u>**

- शिक्षण घेण्यासाठी आदर्श वडिलांचाच होता. वडिलांनी शाळकरी मुलींना पाहिले की, त्यांच्या डोळ्यासमोर मीच उभी रहात असे. त्यांना असे वाटे की, उच्चवर्णीय मुलींनीच का शिकावे? आणि आपल्या मुलींनी नेहमीच काबाडकष्ट का करावे? म्हणूनच त्यांनी आपल्या मुलीला शाळेत घालून समाजापुढे तिचा आदर्श ठेवावा, म्हणजे आपल्या समाजातील उद्या जन्माला येणाऱ्या मुलींच्या पायतली बेडी गळून पडेल. एकंदरीत शाळकरी मुली व वडील या दोन्हींचाही माझ्यापुढे आदर्श आहे.

३) **<u>शिक्षण घेत असताना कोणाचा प्रभाव पडला? नी आपण एवढ्या अडचणी समस्यातून शिक्षण घेतले?</u>**

शिक्षण घेत असताना वडिलांचा एकच निश्चय व संकल्प होता की, आमचा समाज शिक्षणाला जो विरोध करतो आहे. आज जरी त्यांना शिक्षणाचे महत्व पटत नसले तरी उद्या तुझ्याकडे बघून त्यांना शिक्षणाची गोडी लागेल. असे वडिलांचे मत होते. वडिलांचे व माझ्या शिक्षकांचे मला नेहमीच मार्गदर्शन असे. शिवाय मी शाळा शिकत असल्यामुळे माझ्याशी व वडिलांशी कोणीच बोलत नसे. आमच्याकडे पाहून थुंकणे व हसणे याशिवाय समाजाकडून मला काहीच मिळाले नाही. आपण शिक्षण घेतो म्हणून समाज आपला तिरस्कार करत आहे. तर आपणही शिक्षण अर्धवट न सोडता समाजाचा तिरस्कार करावा. शिक्षण पूर्ण करूनच त्यांच्या मनात आपल्याविषयी गोडी निर्माण करावी आणि त्याप्रमाणे समाजाचा तिरस्कार उराशी बाळगूनच समाजाच्या तिरस्काराचा पाठिंबा घेऊनच अडचणीतून वाट काढत शिक्षण घेत गेले.

४) **<u>आपण लेखनाला प्रारंभ केंव्हा केला? त्यावेळी आपले वय किती होते?</u>**

- मी १९८८ मध्ये साधारणत: वयाच्या ३० व्या वर्षी लिखाणाला सुरूवात केली. लेखन सुख किंवा छंद म्हणून केले नसून लेखनाला भयानक दु:खद घटनेमुळे सुरूवात केली आहे. ती दु:खद घटना म्हणजे माझा अपघात ३० एप्रिल १९८८ या दिवशी मी शिवराई ता गंगापूर जि. औरंगाबाद येथून घरी येत असताना हा अपघात झाला. डाव्या पायाच्या मांडीच्या हाडाचे दोन तुकडे झाले. जसे वाळलेले लाकूड मोडावे तसे आणि त्याच क्षणी मी निकामी झाले. चालणे, धावणे सर्व काही थांबले. या प्रसंगामुळे मी लिखाणास सुरवात केली. लेखक हजारो होवोत परंतु सुखाने लिखाणाची सुरूवात व्हावी माझ्यासारखी दु:खातून होऊ नये हीच परमेश्वरचरणी प्रार्थना.

५) **<u>'मरणकळा' शिवाय आणखी काही लेखन केले आहे का? असल्यास कोणते?</u>**

- प्रकाशित फक्त 'मरणकळा'च आहे बाकी सर्व स्त्री जीवनावर व मागासवर्गीयांच्या इतर समस्यांवर लेखन केले आहे. ते अजून प्रकाशित झाले नाही.

६) **<u>तुम्हाला लेखनाच्या बाबतीत कोणी उत्तेजन दिले?</u>**

- माझे पती के. ओ. गिऱ्हे हे लेखक असल्यामुळे त्यांनी मला उत्तेजन दिले. दुसरे म्हणजे प्रा. सुखराम हिवराळे सर ते म्हणायचे 'लहानपणापासून समस्यांना तोंड देत आलीस आणि शेवटी उरला सुरला निसर्गही तुझ्यावर कोपला. तेव्हा तुझं आत्मकथन तू लिहिण्यास सुरवात कर. जेणेकरून समाजामध्ये शिक्षिका होण्याचा मान तू घेतलास आता लेखिकेचाही सोडू नकोस.'' या हेतूने दोघांनीही मला मोलाचे सहकार्य, प्रोत्साहन दिले. आतामात्र हिवराळेसर हयात नाहीत.

७) **<u>आपल्या लेखनाविषयीचे काही अभिप्राय आले का?</u>**

- अभिप्राय भरपूर आलेले आहेत आणि ते सर्वच चांगले आलेले आहेत.

८) **<u>तुमच्या लेखनाला तुम्ही कोणत्या वर्गाकडून प्रतिसाद अपेक्षिता?</u>**

- मी माझे लेखन केवळ भटक्यांच्या मुलींसाठी लिहिले आहे, जेणेकरून त्यांना शिक्षणाची गोडी लागेल व समाजाचा अशिक्षितपणा दूर होईल. शिवाय अपेक्षा आहे, ती शासनाच्या प्रतिसादाची जेणेकरून त्यामुळे समाजाला लिखाणाची व शिक्षणाची गोडी लागेल. तसा माझ्या पुस्तकाला संपूर्ण

समाजांनी प्रतिसाद दिला आहे. कारण आजही माझा मान सन्मान केला जातो आहे. शिवाय चांगल्या लेखकांचा ही प्रतिसाद आहे. उदा. डॉ. सुधीर गव्हाणे डॉ. नागनाथ कोत्तापले सर डॉ. सुधीर रसाळ, प्रा. डोळससर न्यायमूर्ती चपळगावकर डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. मनोहर जाधव, प्रा. अरुणाताई लोखंडे मॅडम.

**९) तुम्हाला वेगळ्या दलित वसाहतीची गरज वाटते का?**

- वेगळी दलित वसाहत असल्यामुळे त्यांच्याशी कार्यकर्त्यांना संपर्क साधणे सोपे जाईल. व वारंवार भेटी देता येतील. त्यांचे प्रश्न काय आहेत याची जाणीव होईल. एखादे कार्य व मिटींग घ्यावयाची असल्यास सोपे जाईल, सवलतीतून कोणीही वंचित राहणार नाही. समानता राहिल. त्यासाठी वेगळी वसाहत असणे आवश्यक आहे.

**१०) तुम्ही सवर्णांचे हिंदू धर्मग्रंथातील विधी सण समारंभात चालीरीती उपासना पाळता का? पाळत असल्यास कोणते?**

- वर्षाचे बारा सण आपण मानतो. परंतु हा सण सर्वांच्याच नावाचा आहे. आणि तो करणे किंवा न करणे हे काही माझ्या वाचनात आलेले नाही. मी पोथीपुराण, ग्रंथ धर्माच्या चालीरीती हे काही वाचत नाही. वाचलेही नाहीत. कारण आजचे युग हे विज्ञान युग आहे. अंधश्रद्धेविषयी आपणच इतरांचे प्रबोधन करीत असतो मग कशावर विश्वास ठेवावा नि कशावर ठेवू नये याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. तेव्हा मनाला वाटले तर थोडे उपास करते परंतु ह्या धर्माचे त्या धर्माचे उपास, पूजाअर्चा यांची मला गरज वाटत नाही.

माझ्यामते या सर्व थोतांडापेक्षा समाजकार्य ही देवपूजा सर्वात श्रेष्ठ पूजा आहे. तेव्हा मी थोडीबहूत ती करते.

**११) मनुस्मृती भगवतगीता या ग्रंथासंदर्भात आपले मत काय?**

- मनुस्मृती या ग्रंथामध्ये आपल्याला घेण्यासारखे काहीच नाही तो भीतीदायक ग्रंथ आहे. त्यामुळे त्याचा विचार न करणेच योग्य. कारण आजच्या युगामध्ये त्या ग्रंथाला स्थान नाही, आणि त्याचा विचारही करू नये.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## १२) सवर्णीयातील कोणते धार्मिक, सामाजिक, पुढारी जवळचे वाटतात?

- डॉ. मांडेसर हे भटक्या समाजावर संशोधन करतात. झोपड्या झोपड्यामध्ये जाऊन त्यांच्याशी चर्चा करतात बोलावेल तेथे ते जातात. त्यामुळे मी त्यांना चांगले ओळखते. हे लेखक आहेत. आणि पुढारी म्हटले तर मला प्रामाणिकपणे भटक्यांना जवळ करणारे पुढारी आवडतात. मग ते मागासवर्गीय असतील किंवा सवर्णातील असतील यात काहीच फरक वाटत नाही.

## १३) अस्पृश्यता फक्त खेड्यात आहे शहरात नाही यासंदर्भात आपले मत काय?

- खेड्यात आणि शहरातही अस्पृश्यता आहे यात शंका नाही. खेड्यातील अस्पृश्यता उघडकीस येते. तशी शहरात समजली जात नाही. आता तसे तोंडाने बोलण्याचे कोणालाच अधिकार राहिलेले नाहीत. की, तू नीच जातीचा आहेस, मी उच्च जातीचा आहे. मला शिवू नको वगैरे त्यामुळे सामुदायिक ठिकाणी असे प्रकार घडत नाहीत. प्रश्न झोपड्या-झोपड्यातून राहणाऱ्या लोकांचा आहे. त्यामुळे मात्र थोडेफार जाणवते की, साधे पाणी मागितले तरी त्यांच्या त्या अस्वच्छतेमुळे का होईना पण थोडासा तिरस्कार केला जातो. यात शंका नाही. पाणी थोडे दुरूनच दिले जाते.

## १५) शेजार कोणाचा असावा? शेजार कोणाचा आवडेल? या संदर्भात आपले मत काय?

- शेजार चांगला असावा. त्यांचे संस्कार चांगले असावेत विचारवंत असावा, जातीवाद करणारा नसावा, मग तो जातीने कोणीही चालेल, सावित्रीबाई फुले, बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा शेजार असावा. स्वत:पुरतेच न बघता इतरांचे सुख-दु:ख जाणणारा शेजार असावा. आजच्या बदलत्या युगात चांगले संस्कार देणारे तितकेच घेणारे कमी आहेत. तेंव्हा नुसताच जातीचा विचार न करता त्याच्या कॅरॅक्टरचा (वर्तणूक) विचार करावा. असा शेजार असावा.

## १६) तुमचे आवडते दलित लेखक कोणते? अदलित कोणते?

- आवडते दलित लेखक डॉ. पानतावणे, प्रा. अविनाश डोळस, डॉ. मनोहर जाधव, सोनकांबळे, सुखराम हिवराळे, अरुणाताई लोंखंडे, दया पवार, लक्ष्मण गायकवाड, लक्ष्मण माने, शांताबाई कांबळे, डॉ. वामनराव जगताप हे होत.

अदलितांची पुस्तके वाचली नाहीत. दलितांचेच एवढे लेखन आहे तर ती ते वाचण्याससुद्धा वेळ नाही. त्यामुळे इतर वाचनाची गरज वाटत नाही.

**१७) आपण कोणती आत्मकथने वाचली?**

- उपरा लक्ष्मण माने, उचल्या-लक्ष्मण गायकवाड, भटक्या के. ओ. गिऱ्हे, गबाळ दादासाहेब मोरे ही आत्मकथने अलीकडेच वाचण्यात आली आहेत.

**१८) आपल्या वडिलांविषयी काय वाटते?**

- माझ्या मनात वडिलांविषयी आदर आहे. वडील जाऊन आता दहावर्षे झाली आहेत. वडिलांनी माझ्यासाठी समाजाचा छळ अन्याय सहन केला. आईवडिलांना एकटीच असल्यामुळे त्यांनी माझ्यासाठी शिक्षणासाठी खूप कष्ट केले त्यांचे उपकार त्यांचे ऋण मी फेडू शकले याची मला खंत वाटते. आणि मला शिकवून मोठे केले त्यामुळे मी खूशही आहे. त्यांच्याबद्दल माझ्या मनात मरेपर्यंत आदरच आहे.

**१९) तुमच्या जीवनातील अत्यंत आनंदाचा व दु:खाचा प्रसंग कोणता?**

- माझ्या जीवनात आनंदाचे क्षण बोटावर मोजण्याइतके आहेत. परंतु दु:खाच्या क्षणाचे मोजमाप नाही.

माझ्या आनंदाचा क्षण म्हणजे ११ डिसेंबर १९८१ हा आनंदाचा क्षण आहे. कारण त्या दिवशी मला नोकरी लागली होती. मला वडिलांच्या व पतीच्या कष्टाचे फळ मिळाले होते. पोटाचा प्रश्न सुटणार होता. समाजात ताठ मान झाली होती. दु:खाचा प्रसंग म्हणजे ३० एप्रिल १९८८ ला शाळेतून येताना झालेला अपघात त्यावेळी माझ्या डोळ्यासमोर माझी लहान लहान मुलेच दिसत होती. त्याक्षणी असे वाटले की, समाजाने तर दु:ख दिलेच परंतु निसर्गालाही हेवा वाटला. तोही शेवटी माझ्यावर कोपला. हा माझा जीवनातला दु:खाचा प्रसंग एक हिस्सा आहे.

२०) **तुमच्या सुखी संसाराची कल्पना काय?**

- माझ्या जीवनात डोंगराएवढे दु:ख होते त्यातून मी वाटचाल केली. माझ्या मुलाबाळांचे आयुष्य सुखी समृद्धीचे व भरभराटीचे जावो. त्यांच्यावर कोणाची वाईट नजर नसावी. मुलांच सुख शेवटी तेही परमेश्वराच्याच हाती आहे.

माझ्या वैयक्तिक जीवनाबद्दल सुखाची वाट माझ्या वाट्याला आलीच नाही. तर आशा करण्यात अर्थच नाही.

**श्री. के. ओ. गिऱ्हे यांची मुलाखत**

१) **आपलं संपूर्ण नाव आणि शिक्षण कुठे झाले?**

- कचरू ओंकारराव गिऱ्हे. प्राथमिक शिक्षण गोलवाडी येथे झाले. माध्यमिक शिक्षण मल्टीपरपज हायस्कूल, छावणी येथे झाले. उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण स. भू. कटाव वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद येथे झाले. पदवीत्तर शिक्षण (एम.ए) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे झाले.

२) **शिक्षणाला प्रेरणा कोणी दिली?**

- शिक्षणाची प्रथम प्रेरणा आईवडिलांची नंतर गुरूजनांची व सुसंस्कृत परिवारामुळे शिक्षणाची गोडी लागली. गाई म्हैशी राखण्यापेक्षा शिक्षण घेतलेले बरे असे लहानपणीच वाटत होते.

३) **एवढ्या अडचणीतून पुढे शिक्षण घेण्याची प्रेरणा कोणी दिली?**

- मी गोलवाडी येथे शिकत असताना काही गुरुवर्यांचा सहवास लाभला. गुरुवर्य पाठक गुरुजी, डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. यू. म. पठाण, ब्रह्मानंद देशपांडे, डॉ. गुरुवर्य प्रभाकर मांडे, डॉ. वि. ल. धारूरकर, डॉ. शरद व्यवहारे, प्रा. अविनाश डोळस, प्रा. सुखराम हिरवळे, विष्णु सलामपुरे अशा माझ्या गुरूजनांनी शिक्षणाची प्रेरणा दिली. माझ्या जीवनाचा काटेरी प्रवास आहे.

**४) <u>आपण एम. फिल साठी जातपंचायत हा विषय निवडण्यामागील भूमिका कोणती होती?</u>**

- जातपंचायत हा विषय निवडण्यामागे दोन भूमिका होत्या. १) गोपाळ समाजात परिवर्तन व्हावे. २) जात पंचायतीच्या मगरमिठीतून त्यांची सुटका व्हावी. गोपाळ समाज हा भटका आहे. अंधश्रद्धेने बुरसटलेला, शिक्षणापासून कित्येक मैल दूर, जन्मापासून मरेपर्यंत अन्याय, अत्याचार सहन करणारा आहे. अशा समाजाविषयी इतरांना माहीती व्हावी या समाजाला परिवर्तनवादी समाज प्रवाहात सामावून घ्यावे. या समाजाविषयी इतर समाजाने आपली मानसिकता बदलावी हा या मागचा हेतू होता. दुसरे असे की, गोपाळ भटक्या समाजात जातपंचायतीचे प्रस्थ आहे. यातून स्त्रियांना पशुतुल्य वागणूक दिली जाते. स्त्रीला बहिष्कृत केल्यानंतर तिचे जिवंतपणी जातपंचायत श्राद्ध करते या अनिष्ठ रूढी प्रथा बंद झाल्या पाहिजेत. याला कोठेतरी वाचा फोडावी म्हणून जातपंचायत हा विषय निवडला 'मढी' हे भटक्या समाजाचे सर्वोच्च न्यायालय समजले जाते.

**५) <u>आपला व्यवसाय कोणता सध्याचा?</u>**

- मी शासकीय नोकर आहे.

**६) <u>तुमच्या लेखनाची प्रेरणा कोणती?</u>**

- भटक्या विमुक्त समाजाच्या समस्या आणि प्रश्न मांडावे हीच प्रेरणा आहे हेतू आहे. आजही भटक्याविमुक्त समाजावर अन्याय होतो. पारधी मारला हाक ना बोंब चोर मारला गेला. खरचं आपण गुन्हेगार आहोत का? इतर समाज या संपूर्ण समाजालाच गुन्हेगार समजतो. या समाजाच्या व्यथा, वेदना इतरांना समाजाव्यात हाच हेतू लेखनाचा आहे. केंद्रबिंदू आहे.

**७) <u>तुम्ही सांगितल्याप्रमाणे धार्मिक राजकीय, तात्विक वाचनाचा तुमच्या लेखनावर काही परिणाम झाला का?</u>**

- माझ्या लेखनामागे डॉ. बाबासाहेब यांची प्रेरणा आहे. माझ्या लेखनाचे प्रयोजन असे की, अन्याय अत्याचाराविरुद्ध लढणे. जे जगलो जे भोगले तेच लिहित गेलो.

८) **भटक्या समाजासाठी आपण काय करू इच्छिता का?**

- भटक्या समाजाच्या विकासासाठी भटक्या समाजाची संघटना आहे. त्या संघटनेचा मी एक सदस्य आहे. संघटनेच्या वतीने भटक्या समाजाला स्थायी करणे, शिक्षणाचे महत्व पटवून देणे, त्यांना हक्काची जाणीव करून देणे, अंधश्रध्दा निर्मूलन करणे असे प्रयत्न करीत आहोत.

९) **भटक्या जमातीला स्थिरता येण्यासाठी ठोस उपाय कोणते?**

- भटक्या समाजाचे प्रथम स्थायीकरण होणे अत्यंत आवश्यक आहे जोपर्यंत भटक्या विमुक्तांचा नेता राजकारणात जात नाही. तोपर्यंत त्यांच्या मागण्या मंजूर होणार नाहीत. शासन सवलतीमध्ये ५२ जाती आहेत प्रत्येकाला समान हक्क असला तरी ज्यांचे नेते राजकारणात आहेत त्यांनाच फायदा होत असतो. त्यामुळे काहींना शासन सवलतीपासून वंचित उपेक्षित राहवे लागते.

१०) **अगदी सुरवातीला आपण 'गोपाळ समाज परंपरा आणि इतिहास' लिहिले त्यानंतर आणखी काय लेखन केले का? त्याची नावे.**

- गोपाळ समाज परंपरा आणि इतिहास 'भटक्या' व 'दोरीवरचं काळीज' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला आहे. असे माझे लेखन आहे.

११) **एखादा विशिष्ट वाचकवर्ग डोळ्यासमोर ठेवून तुम्ही लिहिता का? की आपल्या समाजासाठी लिहिता? आपलं मत सांगा?**

- एखादा विशिष्ट वाचकवर्ग डोळ्यासमोर ठेवून मी लिहित नाही. माझ्या लेखनामधून माझ्या समाजाच्या व्यथा, वेदना मांडल्या आहेत. त्यातून इतरांना थोडी जरी जाणीव झाली तरी माझ्या लेखनाचे सार्थक झाले असे मला वाटते. आता आमच्या समाजाची मुलमुली शिकू लागली आहेत. त्यांना आमची प्रेरणा मिळू लागली आहे. आमच्या वाट्याला जे दु:ख आले ते इतरांच्या वाट्याला येऊ नये अशी माझी मनोमन इच्छा आहे.

१२) **तुमच्या साहित्याला कोणत्या वर्गाकडून प्रतिसाद अपेक्षिता?**

- माझ्या साहित्याला मध्यमवर्गाकडून प्रतिसाद अर्थात जे जीवन मी चित्रित केले. ते विश्व पांढरपेशांच्या नि मध्यमवर्गीयांच्या विश्वापेक्षा वेगळे आहे. त्यांच्या अगतिकतेचा, छळाचा, अज्ञानाचा,

या साऱ्यांची परिणती म्हणजे या साऱ्यांची अस्फूट मूक वेदनेचा आलेख नव्हे तर दस्तऐवज म्हणून त्याची नोंद व्हावी. जे जीवन मराठी साहित्यात आजपर्यंत फारसे आलेले नव्हते ज्याला येऊ दिले जात नव्हते ते लेखन रूपाने येऊ लागले आहे. मराठी साहित्याचा अविभाज्य भाग बनू पहात आहे.

१३) **<u>दलित साहित्य आपण नेमके कशाला म्हणता?</u>**

- उपेक्षित समाजातील निर्माण झालेले प्रश्न जो जो आपल्या साहित्यात उतरवून मानवी मनाला अस्वस्थ करतो त्या त्या समाजाचे प्रतिबिंब आपल्या लेखनीत पकडतो. ते माझ्या मते दलित साहित्य होय. भयग्रस्त मानवी मनाचे चित्रण म्हणजे दलित साहित्य होय.

१४) **<u>दलित साहित्याचे क्रांतीकारकत्व कशात आहे?</u>**

- अगदी दबलेल्या आवाजास डॉ. बाबासाहेब यांनी नवी वाट शोधून दिली. जो कोणी त्या वाटेने येईल तो प्रस्थापिताच्या विरुद्ध विद्रोह पुकारेल म्हणजे जी व्यक्ती सनातनी विचार नाकारून समतेच्या मार्गाने जाईल त्यातच दलित साहित्याचे क्रांतीकारकत्व आहे.

१५) **<u>विद्यमान मराठी साहित्य संकुचित आहे असे वेळोवेळी म्हटले जाते. मग मराठी साहित्य दलित साहित्यामुळे कसे विशाल व समृद्ध होईल?</u>**

- मराठी साहित्यात बहुजणांचे दलितांचे काही अंशी, समाजातील प्रसंगानुसार चित्रण आहे. त्या मराठी साहित्यात दलित नायक बनला नाही. मग ते संकुचित आणि कृत्रिम वाटू लागले. दलित साहित्य वास्तव काय आहे हे दाखविण्यासाठी प्रस्थापितांच्या समाजव्यवस्थेला नाकारतो. त्याचे ते साहित्य अस्वस्थ करते म्हणून ते विशाल आणि वेगळे आहे. वास्तवाच्या अनुभूतीतून निर्माण होते.

१६) **<u>तुमचे आवडते लेखक दलित आणि अदलित?</u>**

- दलित लेखकामध्ये शंकरराव खरात यांचे 'तराळ-अंतराळ' प्र. ई. सोनकांबळे यांचे 'आठवणीचे पक्षी', लक्ष्मण माने यांचे 'उपरा' लक्ष्मण गायकवाड यांचे 'उचल्या', अदलितांमध्ये सानेगुरूजी यांची 'श्यामची आई', ना. धो. महानोर यांच्या 'रानातल्या कविता' इ. लेखक आवडतात.

**१७) दलित आणि भटके साहित्य यामध्ये काही समान प्रश्न आहेत/नाहीत.**

- दलित आणि भटके साहित्य यामध्ये काही प्रमाणात समान प्रश्न आहेत परंतु दलितांपेक्षा भटक्या समाजाची भयानक स्थिती आहे. आजही भटक्या समाजाला भटकंतीचे जीवन जगावे लागत आहे. त्यांना गावगाड्यात उत्पादन प्रक्रियेत कुठेच स्थान नाही, प्रतिष्ठा नाही. कोणत्याही गावचा रहिवासी नसल्यामुळे प्रमाणपत्र मिळत नाही. त्यामुळे हक्कांपासून वंचित राहतो. राहण्याचे ठिकाण एक नसल्यामुळे शिक्षणापासून वंचित राहतो. उपजिविकेचे साधन नसल्यामुळे हालाखीचे जीवन जगतो . साप, माकडे, बैल, पोपट यांचे खेळ करीत भिक्षा मागत उदरनिर्वाह करीत असतो हे महत्वाचे प्रश्न वेगळे आहेत.

**१८) तुमच्या समाजाचा तुमच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा आहे?**

- गोपाळ समाज परंपरा आणि इतिहास हे माझे पहिले पुस्तक १९८६ ला प्रकाशित झाले. ८०/८१ या काळात मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागात मराठी भाषेचे अध्ययन करताना आणि विशेषत: महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाचा शोध घेताना गोपाळ समाजाची परंपरा आणि इतिहासाशी संबंधित जातपंचायतीच्या कथांचा अभ्यास मी केला. जातपंचायतीत सांगितल्या जाणाऱ्या कथा पंचायतीतील संकेत, संवाद, विशेषत: या समाजात एक गुप्तभाषा बोलली जाते. ती मी माझ्या पुस्तकरुपाने बाहेर आणली. त्यामुळे या समाजात अतिशय खळबळ उडाली. याबाबत मला दोष देऊ लागले. चर्चा होऊ लागली. समाजात जाणे-येणे माझे बंद झाले. पंचायत ठिकठिकाणी घेऊ लागले. गोपाळ समाजात जातपंचायतीचे प्रस्थ आहे. परंतु कालांतराने आमच्याविषयीचे गैरसमज दूर होऊ लागले. मुलमुली शिक्षण घेऊ लागले. शिक्षणाचे महत्व त्यांना पटू लागले. पुस्तकाला पुरस्कार मिळू लागले. इतर समाजात आमच्याविषयी आस्था निर्माण होऊ लागली. ह्या समाजाने मला व माझ्या पत्नीला त्रास दिला. बहिष्कृत केले पण त्यांनीच आम्हाला गेल्यावर्षी खासदार प्रकाश आंबेडकर यांचे हस्ते मंगरूळपीर वाशिम येथे 'समाजभूषण' पुरस्कार देऊन गौरविले आहे. पत्नीला गोपाळ समाजाची सावित्रीबाई फुले असे म्हणू लागले. आता आमच्याकडे समाजाचा पहाण्याचा दृष्टिकोन बदलला आहे.

**<u>१९) भटक्यामध्ये साधारणत: २५, २६ वर्षाचा जीवन कालखंड आला आहे. तुमच्या सुखी जीवनाची संसाराची कल्पना काय?</u>**

- माणसाच्या जीवनात पैसा म्हणजेच सर्वस्व नसतो. पत्नी चांगली मिळाली. मुले शिकत आहेत. एकंदर सुखाचा संसार चालू आहे. आता उर्वरीत आयुष्य समाजसेवेसाठी घालवायचे लेखन करायचे.

**<u>२०) तुमच्या जीवनातील अत्यंत आनंदाचा व दु:खाचा प्रसंग कोणता?</u>**

- जीवनात आनंदाचा क्षण डोळ्यात भरावा असा आला नाही. एवढेमात्र खरे की, कराड येथील कुसूर या गावी 'मरणकळा' या आत्मकथनास पुरस्कार मिळाला. या कार्यक्रमास यशवंतराव मोहिते पाटील, एन. डी. पाटील होते. एका भटक्या डोंबाऱ्याच्या मुलीचा एवढा गौरव झाला या कार्यक्रमास भटक्या विमुक्तांचे नेते आसाराम गुरुजी हे सुद्धा होते. कार्यक्रम असा झाला की पंधरा दिवस आमच्या नजरे समोरून तो कार्यक्रम जात नव्हता. तो आमच्या जीवनाचा आनंदाचा क्षण आहे. गेल्यावर्षी सेवाभावी सेवासंस्थांनी आम्हा उभयतांना 'गाडगेबाबा' पुरस्कार देऊन गौरविले. तोही लग्नसोहळ्यासारखा कार्यक्रम झाला.

गेल्यावर्षी माझ्या आईचे दु:खद निधन झाले. तो माझ्या जीवनातील दु:खाचा क्षण जीवनाचा आधार गेला.

माझ्या मायेपुढे थीटे
संमदे देऊळ राऊळ
तिच्या पायाच्या भेगात
माझे अजिंठा वेरूळ
तुझे पोळलेले पाय
तळहातावरती फोड
सोडवित होती तू
मीठ भाकरीची कोर

२१) **‘भटक्या’ या पुस्तकाचे स्वागत कसे झाले? किंवा ‘भटक्या’ संबंधी काही अभिप्राय आले का?**

- ‘भटक्या’ हे पुस्तक प्रसिद्ध झाले तेव्हा वाचकाच्या व समीक्षकांच्या प्रतिक्रिया फार चांगल्या आहेत. डॉ. यू. म. पठाण, डॉ. सुधीर रसाळ, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. न्यायमूर्ती चपळगावकर, डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. एस. एस. भोसले. डॉ. शरद व्यवहारे, प्रा. अविनाश डोळस, कुलगुरू के. पी. सोनावणे, डॉ. प्रल्हाद लुलेकर, डॉ. दादा इथापे, मनोहर जाधव, डॉ. कृष्णा किरवले, डॉ. दिवाकर कुलकर्णी, गिरीष प्रभुणे, डॉ. बाळकृष्ण कवठेकर इत्यादी साहित्यिकांचे चांगले अभिप्राय आले आहेत. तसेच महाराष्ट्रातील सर्व वर्तमानपत्रात अभिप्राय आलेले आहेत.

**संदर्भ**


| | | | |
|---|---|---|---|
| १) | स्त्रियांच्या नवकथा | : | वाटा आणि वळणे, लेखक - मंगला वरखेडे, प्रकाशक - कैलासराणा प्रकाशन, नाशिक, प्रथमावृत्ती - २० मार्च १९९६, पृ. ११४. |
| २) | दलित साहित्य : एक समाजिक-सांस्कृतिक अभ्यास | : | लेखक - प्रा. गो. म. कुलकर्णी, डॉ. विद्याधर पुंडलिक, प्रथमावृत्ती - १ मार्च १९९२, पृ. ५५. |
| ३) | मरणकळा लेखक | : | जनाबाई कचरू गिऱ्हे, प्रकाशन - प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती - जुलै १९९२, पृष्ठ १०. |
| ४) | तत्रैव | : | पृष्ठ १० |
| ५) | साहित्य समाज आणि स्वातंत्र्य लेखक | : | लक्ष्मण गायकवाड, प्रकाशक - दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती - जुलै १९९२, पृ. २५ |
| ६) | मरणकळा | : | पृ. २६ |
| ७) | तत्रैव | : | पृ. २९ |
| ८) | वेदनांचा प्रदेश | : | लेखक - डॉ. प्रल्हाद जी. लुलेकर, प्रकाशक - कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती - मार्च २०००, पृ. २०७ |
| ९) | साहित्य समाज आणि स्वातंत्र्य | : | लेखक - लक्ष्मण गायकवाड, प्रकाशक - दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती - १५ मार्च २००१, पृ. २५ |
| १०) | दलित साहित्य : एक सामाजिक सांस्कृतिक अभ्यास | : | लेखक - गो. म. कुलकर्णी, डॉ. विद्याधर कुलकर्णी, प्रकाशक - सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती - १ मार्च १९९२, पृ. ५१ |
| ११) | ‘भटक्या’ | : | लेखक - के. ओ. गिऱ्हे, प्रकाशक - प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती - १९९१, पृ. ८२. |
| १२) | तत्रैव | : | पृ. ३५ |
| १३) | दलित कथा उगम आणि विकास | : | लेखक - डॉ. प्रकाश खरात, प्रकाशक - सुगावा प्रकाशन, पुणे, पृ. २७. |
| १४) | दलित आत्मचरित्रे साहित्य आणि समाज | : | लेखक - डॉ. रमेश धोंगडे, प्रकाशक - मधुराज पब्लिकेशन्स प्रा. लि. पुणे, प्रथमावृत्ती - १९९२, पृ. ४१. |

| | | | |
|---|---|---|---|
| १५) | अस्मितादर्श | : | दिवाळी अंक १९८३ पृ. ८५ |
| १६) | वेदनांचा प्रदेश | : | लेखक डॉ. प्रल्हाद जी. लुलेकर, प्रकाशक - कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती - मार्च २०००, पृ. २४ |
| १७) | भटक्या | : | लेखक - के. ओ. गिऱ्हे, प्रकाशक - प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती - १९९१, पृ. १९. |
| १८) | तत्रैव | : | पृ. ३८/३९ |
| १९) | तत्रैव | : | पृ. ३३ |
| २०) | तत्रैव | : | पृ. २९/३४ |
| २१) | तत्रैव | : | पृ. ७३ |
| २२) | दलितांची आत्मकथने : संकल्पना व स्वरूप | : | लेखक - डॉ. वासुदेव मुलाटे, प्रकाशक - स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती - जानेवारी १९९९, पृ. ४३ |
| २३) | मरणकळा | : | लेखक - जनाबाई कचरू गिऱ्हे, प्रकाशक - प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती जुलै १९९२, पृ. १७. |
| २४) | भटक्या | : | लेखक - के. ओ. गिऱ्हे, प्रकाशक - प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती - १९९१, पृ. २१. |
| २५) | मरणकळा | : | लेखक - जनाबाई कचरू गिऱ्हे, प्रकाशक - प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती जुलै १९९२, पृ. ९/१३. |
| २६) | भटक्या | : | लेखक - के. ओ. गिऱ्हे, प्रकाशक - प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती - १९९१, पृ. १५. |
| २७) | मरणकळा | : | पृ. २६ |
| २८) | भटक्या | : | पृ. २८ |
| २९) | तत्रैव | : | पृ. २७ |
| ३०) | मरणकळा | : | पृ. २४ |
| ३१) | भटक्या | : | पृ. २७ |
| ३२) | व्यक्ती आणि वल्ली | : | शीर्षक, लेखक - पु. ल. देशपांडे |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३) | मरणकळा | : | पृ. २९ |
| ३४) | तत्रैव | : | पृ. ४३ |
| ३५) | तत्रैव | : | पृ. २४ |
| ३६) | मनुस्मृती | : | ८.३ |
| ३७) | वेदनांचा प्रदेश | : | लेखक - डॉ. प्रल्हाद जी. लुलेकर, प्रकाशक - कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती - १ मार्च २०००, पृ. २०४. |
| ३८) | भटक्या | : | पृ. ६ |
| ३९) | तत्रैव | : | पृ. २९ |
| ४०) | दलित साहित्य : एक आकलन | : | लेखक प्रा. बाळकृष्ण कवठेकर, प्रकाशक - अनिलकुमार मेहता, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, प्रथमावृत्ती - १९८१, पृ. ८१. |
| ४१) | दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र | : | लेखक - डॉ. शरणकुमार लिंबाळे, प्रकाशक - कांता प्रकाशन, बार्शी, प्रथमावृत्ती - १७ ऑगस्य १९९६, पृ. १४. |
| ४२) | मरणकळा | : | पृ. ९ |
| ४३) | तत्रैव | : | पृ. १८ |
| ४४) | तत्रैव | : | पृ. १३ |
| ४५) | तत्रैव | : | पृ. १७ |
| ४६) | बालकांड | : | लेखक - ह. मो. मराठे, प्रथमावृत्ती - जून २००१, प्रास्ताविक |
| ४७) | भटक्या | : | पृ. ६३ |
| ४८) | तत्रैव | : | पृ. २८/३४ |
| ४९) | तत्रैव | : | पृ. २७ |
| ५०) | तत्रैव | : | पृ. १९ |
| ५१) | स्त्री आत्मकथन | : | संपादन - चंद्रकुमार नलगे, गंगाधर पानतावणे, प्रकाशक - सुरेश एजन्सी, प्रथमावृत्ती - जुलै १९९०, प्रस्तावना |